रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३२०
www.ramprahar.com

गुरुवार, ८ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मुंब्र्यात ऑनलाईन मोबाईल गेमद्वारे मुलांचे धर्मांतर



**मुंबई** : उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये मोबाईल ऑनलाईन गेमिंगद्वारे धर्मांतर करण्यात आले आहे. या धर्मांतराला महाराष्ट्र कनेक्शन असून मुंब्र्यातही ४०० जणांचे धर्मांतर करण्यात आले आहे. याबाबत ऑनलाईन धर्मांतर करणाऱ्या मुख्य आरोपीने गौप्यस्फोट केल्याचे पोलिसांनी सांगितले. मोबाईल गेमच्या आडून ब्रेन वॉश करीत धर्मांतर केले जात होते. मुख्य आरोपीची चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. महाराष्ट्रातील मुंब्र्यात ४०० जणांचे धर्मांतर करण्यात आल्याचे आरोपीने जबाबात सांगितले. ही एक मोठी टोळी असून ती ऑनलाईन गेम खेळणाऱ्या मुलांना हेरते. सुरुवातीला या खेळात मुलांना हरवले जाते. मग त्यात फसवले जाते आणि पुढे त्यांचा धर्मांतराच्या उद्देशाने ब्रेन वॉश केला जातो. मग ही मुले धर्मांतराचे शिकार होतात. या प्रकरणाचा अधिक पोलीस तपास सुरू आहे.

### अंतरंग

मालमत्ता कराविरोधातील याचिका फेटाळली/२

शिवाजीनगरमध्ये भव्य जलकुंभाची निर्मिती/३

'आरटीआयएससी'चे कराटेपटू ठरले चॅम्पियन/८

# नवी मुंबई विमानतळ वेळेतच सुरू होणार





### मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; उपमुख्यमंत्र्यांसह केली हवाई पाहणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ केवळ राज्याच्या नव्हे; तर देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे विमानतळ ठरणार आहे. नियोजित वेळेत हे विमानतळ सुरू व्हावे यासाठी आजची पाहणी आहे. या कामातील अडचणी दूर करण्यासाठी राज्य शासन आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. ७) केले. उलवे येथे प्रत्यक्ष विमानतळाची हेलिकॉप्टरद्वारे पाहणी केल्यावर अदानी समुहाच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे, डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार महेश बालदी, एमएमआरडीएचे संचालक डॉ. संजय मुखर्जी, विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, सहसंचालक कैलास शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख आदी उपस्थित होते.

नवी मुंबई विमानतळ हे पुणे, मुंबई, गोवा यांच्यासाठी महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे भूमिपूजन झाले होते आणि उद्घाटनदेखील त्यांच्या हस्ते होईल. विमानतळ उभारणीत चांगले व वेगाने काम सुरू आहे यांचा आनंद आहे. हा प्रकल्प लोकांसाठी लवकर खुला होईल यासाठी सर्व प्रयत्न सुरू आहेत, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. (पान २ वर..)

कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

## अभिजीत विवेकानंद पाटील यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर उद्या निकाल

**पनवेल : प्रतिनिधी**

कोट्यवधी रुपयांच्या कर्नाळा बँक घोटाळ्यात बँकेचे अध्यक्ष व शेकापचे माजी आमदार विवेकानंद पाटील यांचे पुत्र व बँक संचालक अभिजीत पाटील यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अपर्णा वडके यांच्या जामीन अर्जावरील पनवेलच्या जिल्हा न्यायालयातील सुनावणी पूर्ण झाली आहे. याबाबतचा निकाल शुक्रवारी (दि. ९) देण्यात येणार असल्याचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी सांगितले. त्यामुळे आता विवेक पाटील यांच्यापाठोपाठ त्यांचा मुलगाही तुरूंगात जाण्याची शक्यता आहे.

कर्नाळा बँकेच्या संचालक मंडळाने व बोगस कर्जदारांनी गैरव्यवहार करून ६३३ कोटींपैकी ५१२ कोटी ५४ लाख ५३ हजार रुपयांचा अपहार करून बँकेची स्थिती डबघाईला आणली. हा प्रकार उजेडात आल्यानंतर फेब्रुवारी २०मध्ये विशेष लेखा परीक्षक उमेश तुपे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार नवी मुंबई पोलिसांनी कर्नाळा बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्यासह संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कर्जदार अशा एकूण ७६ जणांवर फसवणुकीसह अफरातफर, बनावटगिरी त्याचप्रमाणे सहकारी संस्था अधिनियम कलम १४७सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम कलम ३ अन्वये गुन्हा दाखल केला. नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा तपास सुरू होता. या प्रकरणाची व्याप्ती पाहता राज्याच्या पोलीस महासंचालकांनी याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार या प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणात आपल्याला अटक होऊ नये यासाठी अभिजीत विवेकानंद पाटील यांनी अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. न्यायालयीन कोठडीत असलेल्या अपर्णा वडके यांनीही पनवेलच्या जिल्हा न्यायालयात जामीन अर्ज केला होता. याबाबतची सुनावणी सोमवारपासून अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांच्यासमोर सुरू होती. अभिजीत पाटील यांच्यातर्फे अ‍ॅड. राहुल ठाकूर व अपर्णा वडके यांच्यातर्फे अ‍ॅड. पी. एम. ठाकूर यांनी युक्तिवाद केला, तर सरकारतर्फे अ‍ॅड. वाय. एस. भोपी यांनी युक्तिवाद केला. या वेळी ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आता शुक्रवारी न्यायालय काय निकाल देणार याकडे ठेवीदारांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री वेंकटेश्वर मंदिराचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १२ येथे दहा एकर परिसरात साकारण्यात येणाऱ्या तिरूमला तिरुपती देवस्थानाच्या श्री वेंकटेश्वर स्वामी वारी मंदिराचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी (दि. ७) झाले. या वेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी आजचा दिवस सर्वांसाठी मंगलमय असल्याचे प्रतिपादन केले.

या सोहळ्यास रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे, डॉ. श्रीकांत शिंदे, सर्वश्री आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, भरत गोगावले, महेंद्र थोरवे, मंदा म्हात्रे, रेमंड समूहाचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया, तिरूमला देवस्थानचे अध्यक्ष वाय. व्ही. सुब्बा रेड्डी व इतर मान्यवर उपस्थित होते.

भूमिपूजनानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रत्येकाला आंध्र प्रदेशात जाऊन तिरुपती बालाजीचे दर्शन घेण्यास जायला जमत नाही. अशा वेळी या ठिकाणी येऊन दर्शन होणार आहे. हे मंदिर साकारण्यासाठी शासनाकडून सर्व सहकार्य केले जाईल.

तिरूमला ट्रस्टचे अध्यक्ष रेड्डी यांनी या मंदिराच्या साकारण्याविषयीची थोडक्यात माहिती दिली.

## कुस्तीपटूंचे आंदोलन स्थगित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंग यांच्याविरुद्ध लैंगिक शोषणाचे आरोप करीत पदक विजेत्या महिला कुस्तीपटूंनी आंदोलन सुरू केले होते. आता हे आंदोलन १५ जूनपर्यंत स्थगित केले असल्याची माहिती कुस्तीपटू बजरंग पुनियाने दिली.

केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

## निवडक

### बीएसएनएलसाठी ८९ हजार कोटींच्या पॅकेजला मंजुरी

**नवी दिल्ली** : केंद्रीय मंत्रिमंडळाने भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) साठी ८९,०४७ कोटी रुपयांच्या पुनरुज्जीवन पॅकेजला बुधवारी (दि. ७) मंजुरी दिली. हे पॅकेज ४जी आणि ५जी सेवा वाढवण्यासाठी वापरले जाईल. मंत्रिमंडळाने बीएसएनएल आणि भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेडच्या विलीनीकरणालाही मान्यता दिली आहे.

### जेजुरी ग्रामस्थांच्या आंदोलनाला अखेर यश

**जेजुरी** : येथील ग्रामस्थांनी खंडोबा देवस्थानमध्ये नेमलेल्या विश्वस्त निवडीविरोधात पुकारलेल्या आंदोलनाला यश आले आहे. मार्तंड देवस्थानाच्या विश्वस्त मंडळाची सदस्यसंख्या सातवरून ११ होणार आहे. जेजुरी ग्रामस्थांमधून सहा आणि बाहेरचे पाच अशी विश्वस्तांची नियुक्ती होणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या सुनावणीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## औरंग्याच्या इतक्या औलादी अचानक कुठून पैदा झाल्या? : उपमुख्यमंत्री

■ कोल्हापूरकरांना शांततेचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अचानक औरंग्याच्या इतक्या औलादी महाराष्ट्रात कुठून पैदा झाल्या? हे आपल्याला शोधावे लागेल. याच्यामागे कोण आहे हेसुद्धा पाहावे लागेल, असे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कोल्हापूरमध्ये मंगळवारी औरंगाजेबाच्या स्टेटसवरून वाद निर्माण झाल्यानंतर दगडफेकीचा प्रकार घडला होता. या पार्श्वभूमीवर हिंदुत्ववादी संघटनांकडून बुधवारी (दि. ७) कोल्हापूर बंद आणि ठिय्या आंदोलन करण्यात आले. या संदर्भात ते बोलत होते. त्यांनी शांततेचे आवाहन केले आहे.

उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात औरंग्याच्या इतक्या औलादी अचानक कुठून पैदा झाल्या? जाणीवपूर्वक कायदा आणि सुव्यवस्था खराब झाली पाहिजे यासाठी तर या औलादी पैदा झाल्या नाहीत ना हे आपल्याला तपासावे लागेल. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. हे नव्याने पैदा झाले आहेत, त्यांचे बोलविते धनी कोण हे शोधल्याशिवाय आम्ही राहणार नाही.

महाराष्ट्रात औरंगजेबाचे उदात्तीकरण कोणी केले तर साहजिक संताप होतोच, पण त्यासाठी कायदा हातात घेतल्यास त्याचे समर्थन होऊ शकत नाही. कोल्हापूरमध्ये आता परिस्थिती नियंत्रणाखाली आहे. पोलीस बंदोबस्त तैनात आहे. माझी सर्वांना विनंती आहे की, कोणीही कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही याची काळजी घ्यावी, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

## धाटाव एमआयडीसीत कंपनीला आग; एक गंभीर





**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोह्याच्या धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रोहा डायकेम कंपनीत बुधवारी (दि. ७) दुपारी आग लागून स्फोट झाले. या दुर्घटनेमध्ये एक कामगार गंभीर जखमी झाला आहे.

रोहा डायकेम कंपनीच्या प्लांट नंबर दोनमधील कोळसा गोदामात बुधवारी दुपारी दीडच्या सुमारास अचानक आग लागली व स्फोटांची मालिका सुरू झाली. या वेळी प्रयाग हशा डोलकर (वय ३३, रा. खारापटी) हा कामगार भाजल्याने त्यांनी जीव वाचवण्यासाठी तिसऱ्या मजल्यावरून उडी मारली. त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झालेली आहे. त्यांना ऐरोली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच रोहा दौऱ्यावर असलेले भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय टंडन, रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार धैर्यशील पाटील, युवा मोर्चा दक्षिण जिल्हा अध्यक्ष अमित घाग, भाजप धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस तथा तळ्याचे नगरसेवक रितेश मुंढे, नरेश कोकरे, रोहा शहराध्यक्ष निलेश धुमाळ, भाजप कामगार आघाडी रोहा अध्यक्ष विलास डाके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून आढावा घेतला. (पान २ वर..)

### अधिवेशनात मुद्दा उपस्थित करणार -आमदार प्रशांत ठाकूर

रोहा डायकेम कारखान्यातील आग भीषण होती, परंतु परमेश्वरच्या कृपेने कोणतीही जीवित हानी झालेली नाही, मात्र एका कामगाराला दुखापत झाली आहे. अशा आगी वारंवार कशामुळे लागतात? त्यासाठी प्रतिबंधकात्मक यंत्रणा सतर्क आहे का? कारखान्यात धोकादायक परिस्थितीमध्ये पाण्याच्या पाईपलाईन कार्यरत आहेत का? कार्यरत नसतील तर त्या का नाहीत याची फॅक्टरी इन्स्पेक्टर व संबंधित सेफ्टी ऑफिसर्स कारणे शोधतीलच, पण येथील कामगार व आजूबाजूला राहणाऱ्या लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आगामी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

## मोदी सरकारचा शेतकऱ्यांना आधार



### खरीप पिकांच्या किमान आधारभूत दरात वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने खरीप पिकांच्या किमान आधारभूत दरामध्ये (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी आशा केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी व्यक्त केली आहे.

देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे तसेच जास्तीत जास्त प्रदेश कृषी पिकाखाली यावा यासाठी केंद्र सरकारने किमान आधारभूत दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत माहिती देताना केंद्रीय अन्न आणि ग्राहकमंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले की, कृषी खर्च आणि किमती आयोगाकडून वेळोवेळी येणाऱ्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्र सरकारने केले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी खरीप पिकांसाठी सर्वाधिक किमान हमीभाव जाहीर करण्यात आला आहे आणि त्याचा फायदा देशातील शेतकऱ्यांना होणार आहे.



### कोणत्या पिकांना किती हमीभाव?

- भात २१८३ रुपये (१४३ रुपयांची वाढ)
- ज्वारी हायब्रिड ३१८० रुपये (२१० रुपयांची वाढ)
- ज्वारी मालदांडी ३२२५ रुपये (२३५ रुपयांची वाढ)
- बाजरी २५०० रुपये (१५० रुपयांची वाढ)
- नाचणी ३८४६ रुपये (२६८ रुपयांची वाढ)
- मका २०९० (१२८ रुपयांची वाढ)
- तूर ७००० रुपये (४०० रुपयांची वाढ)
- मूग ८५५८ रुपये (८०३ रुपयांची वाढ)
- उडीद ६९५० रुपये (३५० रुपयांची वाढ)
- भुईमुग ६३७७ रुपये (५२७ रुपयांची वाढ)
- सुर्यफूल बिया ६७६० (३६० रुपयांची वाढ)
- सोयाबीन ४६०० रुपये (३०० रुपयांची वाढ)
- तीळ ८६३५ रुपये (८०५ रुपयांची वाढ)
- कापूस ७०२० रुपये (६४० रुपयांची वाढ)

## सर्व शासकीय वसतिगृहांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील घटनेनंतर सरकार अलर्ट मोडवर

मुंबईतील चर्नी रोड येथील शासकीय वसतिगृहात झालेल्या एका मुलीच्या बलात्कार व हत्येनंतर राज्य सरकार अलर्ट मोडवर गेले आहे. राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. यासाठी उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली असून ही समिती एका आठवड्यात अहवाल सादर करणार आहे.

चर्नी रोड येथील शासकीय वसतिगृहात १८ वर्षीय विद्यार्थिनीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणातील संशयित आरोपीचा चर्नी रोड रेल्वेस्थानकात मृतदेह आढळला. ओमप्रकाश कनोजिया नावाचा असे त्याचे नाव असून तो वसतिगृहात वॉचमनची नोकरी करायचा. याच वसतिगृहात तो आधी धोबी म्हणून काम करायचा. वसतिगृह प्रशासनाने ओमप्रकाशला कोणाच्या परवानगीने वॉचमनची नोकरी दिली, असा प्रश्न भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी उपस्थित केला आहे.

### डब्ल्यूटीसी फायनल



लंडन : जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिल्या दिवशी भारताच्या मोहम्मद शमीने ऑस्ट्रेलियाच्या मार्नस लाबूशेनला बाद केले. त्या वेळी टीम इंडियाने केलेला आनंद.

# राज्यात लवकरच १३ हजार मेगावॅट वीजनिर्मिती होणार

## उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी ७१ हजार कोटींची गुंतवणूक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन राज्य सरकारने येत्या काळात १३ हजार ५० मेगाव्हॅट विजेच्या निर्मितीबाबत नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (एनएचपीसी) तसेच टोरंट पॉवर लिमिटेड या दोन कंपन्यांशी सोमवारी सामंजस्य करार केला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या दोन्ही कंपन्या उदंचन (पंम्पिग स्टोरेज) जलविद्युत प्रकल्प उभारणीच्या माध्यमातून राज्यात तब्बल ७१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून त्यातून ३० हजार रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी तसेच शेती, उद्योग आणि व्यावसायिक क्षेत्राची विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी या कराराचा फायदा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सरकारने नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेडसोबत सात हजार ३५० तर टोरंट पॉवर लिमिटेडसोबत पाच हजार ७०० मेगावॅट वीज निर्मितीबाबतचे करार करण्यात आले असून या कंपन्या अनुक्रमे ४४ हजार कोटी आणि २७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत. नॅशनल हायड्रोचे प्रकल्प सावित्री (२२५० मेगाव्हॅट), काळू (११५० मेगाव्हॅट), केंगाडी (१५५० मेगाव्हॅट), जालोंद (२४०० मेगाव्हॅट), तर टोरंट कर्जत (तीन हजार मेगाव्हॅट), मावळ (१२०० मेगाव्हॅट), जुन्नर (१५०० मेगाव्हॅट) येथे वीज प्रकल्प उभारणार आहे. यातून ३० हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य कराराच्या वेळी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक पी. अनबलगन, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच एनएचपीसीचे संचालक विश्वजित बसू, टोरंट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जिनल मेहता आदी उपस्थित होते.

### उपमुख्यमंत्र्यांची विरोधकांवर टीका

विरोधकांवर टीका करताना राज्यात आमचे सरकार सर्वसामान्यांसाठी अनेक उपाययोजना राबवित असून, आम्ही सरकार आपल्या दारीसारखे उपक्रम राबवित आहोत. पूर्वीच्या सरकारचा सरकार स्वत:च्या घरी असा कारभार होता, अशी टीका फडणवीस यांनी या वेळी केली.



# रोह्यात मोकाट श्वानांच्या बंदोबस्तासाठी अनोखे उपोषण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी शहरात वाढलेल्या मोकाट श्वानांमुळे नागरिकांना त्रास होत आहे. यासंबंध नगर परिषदेला वारंवार तक्रार देऊनही ठोस उपाययोजना न केल्याने सामाजिक कार्यकर्ते बिलाल मोर्बेकर यांनी बुधवारी (दि. ७) उपोषण केले.

या उपोषणास माजी नगरसेवक अहमद दर्जी, शिवसेना अल्पसंख्याक सेल शहरप्रमुख उस्मान रोहेकर, भाजप उपतालुका प्रमुख शैलेश रावकर, शिवसेना शहर प्रमुख मंगेश रावकर आदींनी भेट दिली.

भटक्या श्वानांची दहशत पसरली आहे. शहरात १५०० ते २००० भटके श्वान आहेत. नगर परिषदेच्या वतीने २० लाख खर्च करून केवळ १००० श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले. उर्वरित श्वान अद्यापही मोकाटच असल्याचे त्यांनी सांगितले.

नगर परिषदेने या उपोषणाची दखल घेत बिलाल मोर्बेकर यांना भटक्या श्वानांचे लसीकरण व निर्बिजीकरणासाठी नव्याने एजन्सी नेमण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले आहे. यामुळे समाधान व्यक्त करीत बिलाल मोर्बेकर यांनी आपले उपोषण मागे घेतले. या वेळी प्रशासन अधिकारी श्रीनिवास पाटील, नितीन परब, आप्पा देशमुख, उस्मान रोहेकर, नगर परिषदेचे उदयनाथ ठाकरे, सुधीर भगत, आनंदा बंडगर, प्रसाद शिंदे, निलेश चाळके आदी उपस्थित होते.

### फेरनिविदा काढण्याची प्रक्रिया सुरू

रोहा नगर परिषदेने भटक्या श्वानांना अँटीरेबीज लस देत त्यांचे निर्बिजीकरण करण्यासाठी १२ एप्रिल रोजी निविदा प्रसिद्ध केली आहे, मात्र एकही दरपत्रक प्राप्त झाले नाही. या कामाची फेरनिविदा काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रशासकीय प्रक्रियेनंतर निर्बिजीकरण सुरू होईल.

# पनवेल महापालिका नगर पथविक्रेता समिती निवडणुकीत ५९.३० टक्के मतदान

**पनवेल : प्रतिनिधी**

दिनदयाळ अंत्योदय योजना –राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानांतर्गत फेरीवाल्यांना सहाय्य या घटकांतर्गत पनवेल महापालिकेच्या नगर पथविक्रेता समितीच्या २०२३-२४साठी निवडणूक बुधवारी (दि. ७) चार प्रभाग समिती अंतर्गत चार मतदान केंद्रावर घेण्यात आली. आठ नगर पथविक्रेता सदस्यांसाठीची २०२३ ते २०२८करिताची पंचवार्षिक निवडणूक चारही प्रभागामध्ये घेण्यात आली. या निवडणुकीसाठी १३ उमेदवार रिंगणात आहेत. एकूण तीन हजार ७६ मतदार होते. या वेळी ५९.३० टक्के मतदान झाले. मतमोजणी व निकाल गुरुवारी (दि. ८) होणार आहे.

आठ सदस्यांसाठी ही निवडणूक घेण्यात आली. यापैकी एका अनुसूचित जाती पदासाठी एकच नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले, तसेच अनूसुचित जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गासाठी एकही नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे एकूण पाच प्रवर्गासाठी १३ उमेदवारांनी निवडणूक लढविली.

प्रभाग अ, खारघर येथे गोखले हायस्कूल, खारघरचा राजा गणपती मंदिरासमोर सेक्टर १२, प्रभाग ब कळंबोली येथे काळभैरव मंगल कार्यालय, कळंबोली प्रभाग कार्यालयासमोर, प्रभाग क कामोठे सुषमा पाटील विद्यालय कृष्णा हॉटेल रोड, प्रभाग ड पनवेलमध्ये गुजराती शाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड या ठिकाणी हे मतदान घेण्यात आले. या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी शितल कुलकर्णी आणि नोडल अधिकारी म्हणून उपायुक्त कैलास गावडे यांनी काम पाहिले.

**पनवेल : महापालिका नगर पथविक्रेता समितीच्या निवडणुकीत भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखालील व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील पॅनेल विजय मिळवेल, असा विश्वास माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी मतदानानंतर व्यक्त केला. या वेळी उमेदवार अंजू कोळी व अन्य भगिनी उपस्थित होत्या.**



# कामगार नेते सुरेश पाटील यांची गोवा पोर्टच्या चेअरमनसोबत चर्चा



**पणजी : वृत्तसंस्था**

भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांनी गोवा पोर्टचे चेअरमन एन. नवीनकुमार यांच्यासोबत कामगार व कंत्राटी कामगार यांच्या विविध प्रश्नांविषयी सविस्तर चर्चा केली.

या भेटीदरम्यान त्यांचे सहकारी भारतीय मजदूर महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकरशेठ पाटील, गोवा बीएमएसचे सचिव के. प्रकाश, स्थानिक कामगार प्रतिनिधी उपस्थित होते. जेएनपीटी च्या कंत्राटी कामगारांना लागू केलेला वेतन करा येथील गोवा पोर्टच्या कंत्राटी कामगारांनासुद्धा लागू करावा, अशी विनंती केली. या भेटीदरम्यान गोवा पोर्टचे व्हाईस चेअरमन जी. के. राय व त्यांचे इतर अधिकारीदेखील उपस्थित होते.या चर्चेदरम्यान गोवा पोर्टच्या चेअरमन एन. नवीनकुमार यांनी कामगारांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर त्यांना न्याय देण्याचे मान्य केले.

# पनवेल मनपा मालमत्ता कराविरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कराविरोधात नम्रता तलाकोक्कुला यांच्या वतीने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर बुधवारी (दि. ७) उच्च न्यायालयात न्यायमूर्ती एस. बी. शुक्रे आणि न्यायमूर्ती आर. एन. लड्डा यांच्या खंडपीठापुढे सुनावणी घेण्यात आली. या वेळी उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळण्यात आल्याचा निकाल दिला.

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस हरकत घेत नम्रता तलाकोक्कुला यांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केली होती. महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. आशुतोष कुंभकोणी यांच्यासमवेत अ‍ॅड. केदार दिघे यांनी या याचिकेमध्ये विधीज्ञ म्हणून काम पाहिले. याबाबत न्यायालयामध्ये वेळोवेळी सुनावण्याही झाल्या होत्या.

याबाबत बुधवारी उच्च न्यायालयाने दोन्ही पक्षाच्या बाजू ऐकल्यानंतर नम्रता तालाकोक्कुला यांची याचिका कायद्यात किंवा तथ्यावर टिकू शकणारी नसल्याने, सदर याचिका न्यायालयाने फेटळली असल्याचा निकाल दिला.

मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ताकरामध्ये प्रतिमहा दोन टक्के शास्तीमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांचा मालमत्ता कर भरण्याकडे ओढा वाढत आहे. मागील १ एप्रिलपासून ते ३१ मेपर्यंत सुमारे ४० हजार मालमत्ताधारकांनी १०५ कोटी इतका विक्रमी भरणा केला आहे.

पनवेल महानगरपालिकेचा मालमत्ता कर हा शहराच्या विकासकामांसाठी असल्याने मालमत्ता कर भरणे अनिवार्य आहे. महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरून शहराच्या विकासास हातभार लावावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| RFx No. | Description | Estimated Cost |
|---|---|---|
| Tend-17/ 23-24 **RFx No. 7000027642** | Supply & Installation of WTI and OTI of ICT and EHV Transformers at various Substations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 28.88 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost. **Tender Fee**: Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 08.06.2023 to 15.06.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 16.06.2023 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**


# वादळग्रस्त मच्छीमारांच्या कुटुंबाला हवी शासकीय मदत

**खोपोली : प्रतिनिधी**

अचानक आलेल्या वादळी वाऱ्यात रविवारी (दि. ४) झाड अंगावर पडल्याने जागीच मृत्यू झालेल्या नेरळ धामोते येथील भगवान तुकाराम जाधव (वय ५८ वर्षे) यांच्या कुटुंबाला प्रशासनाने मदतीचा हात देण्याची आवश्यकता असून तहसीलदार आयुब तांबोळी यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवल्याची माहिती दिली.

भगवान जाधव पाताळगंगा नदीत रबरीट्यूबवर बसून खालापूर येथील नटीचे फार्म हाऊसजवळ नदीकिनारी मासेमारी करीत असताना वादळाच्या तडाख्यात झाड अंगावर पडून मृत्यू झाला. नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झाल्यामुळे शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी होत आहे. याबाबत तहसीलदार आयुब तांबोळी यांनी भगवान जाधव यांच्या कुटुंबाला मदत शासनाच्या निकषात मिळावी यासाठी प्रस्ताव पाठविला आहे.

> **नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झाल्याने शासनाचे निकषात बसत असल्यास भगवान जाधव यांच्या कुटुंबाला मदत मिळेल. तसा प्रस्ताव पुढे पाठविला आहे.**
> **–आयुब तांबोळी, तहसीलदार, खालापूर**

# महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर : डॉ. संजीव कुमार

**मुंबई : प्रतिनिधी**

महापारेषणच्या माध्यमातून विविध प्रकल्पांची कामे अतिशय वेगाने सुरू आहेत. सुधारित आरओडब्ल्यू धोरणामुळे शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळणार आहे. महापारेषणकडून नुकसान भरपाई देण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी महापारेषणच्या खात्यातून रक्कम थेट जमीन मालकाच्या खात्यात जमा होणार आहे, असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी केले.



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या १८व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या वेळी कंपनीचे संचालक विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) नसीर कादरी, संचालक (वित्त) अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे उपस्थित होते.

सुरुवातीला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणला दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा संदेश दिला. महापारेषणचे संचालक सुगत गमरे म्हणाले, कंपनीची संस्कृती व कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ वातावरण निर्माण करण्यासाठी महापारेषणतर्फे वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. नसीर कादरी म्हणाले, महाराष्ट्रातील विविध उपकेंद्रात इतर अधिकारी व कर्मचारी काम करीत असल्यामुळे आपण हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम करीत आहोत. विश्वास पाठक म्हणाले, तिन्ही कंपन्यांकडे विविध संधी व आव्हाने आहेत. सध्या २८ हजार मेगाव्हॅट मागणी आहे, भविष्यात वाढेल. त्यासाठी महापारेषणचे जाळे मजबूत करावे लागेल.

विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (EXTENSION)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-24/ 2023-24 Dtd. 31.05.2023 **RFx No. 7000027548** | **Sub:** Extension for SRM E-Tender for the work providing supply of various size of Nuts, Bolts, Clamp and Connectors at various Substations under EHV (O&M) Division, Mahad. | Up to Rs. 4,97,697/- (Including GST) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is the higher **Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess. **Bid Submission is From:** 31.05.2023 @ 00:00 Hrs to 06.06.2023 @ 23:59 Hrs for above tender & **Further Extended up to** 14.06.2023 @ 23:59 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089 **Note:** All eligible Suppliers/ Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


## पान १ वरुन

### नवी मुंबई विमानतळ वेळेतच सुरू होणार

नवी मुंबई विमानतळाचे काम अतिशय वेगाने सुरू असून हे विमानतळ देशातील अद्वितीय असे विमानतळ असेल अशी ग्वाही देत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०२४पर्यंत हे विमानतळ सुरू करण्याचा प्रयत्न असेल. या दृष्टीने विमानतळाच्या कामात येणाऱ्या अडचणी सोडवून कामाला गती द्यावी हा आजच्या पाहणीचा उद्देश आहे. विविध दळणवळणाची साधने या विमानतळाला जोडण्यात येणार असून मुंबईला विमानतळाच्या माध्यमातून एक चांगली भेट देणार असल्याचेही त्यांनी म्हटले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ११.४ किलोमीटर परिसरात उभे राहत असून येथे दोन धावपट्या असतील. पहिल्या टप्प्यात चार टर्मिनल असणार असून ४२ विमाने उभी राहतील. या ठिकाणी ५५०० क्षमतेचे कार पार्किंग असेल. विमानतळास २२ किलोमीटरचा सी-लिंक महत्त्वाचा दुवा ठरेल. दरवर्षी नऊ कोटी प्रवासी वाहतूक होईल. म्हणूनच मोठ्या शहरासाठी हा प्रकल्प लोकांना दिलासा देणारा आहे. याची क्षमता वाढविण्यासाठी परवानगीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

विमानतळाच्या उभारणीबाबत अडचणी तत्काळ दूर कराव्यात आणि २०२४मध्ये प्रवासी वाहतूक सुरू करावी, अशा सूचना या वेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी केल्या.

### धाटाव एमआयडीसीत कंपनीला आग; एक जखमी

या वेळी स्फोटांच्या आवाजाने संपूर्ण परिसर दणाणला होता तसेच आगीमुळे प्रचंड धुराचे लोट दिसत होते. परिणामी घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार किशोर देशमुख, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, रोहा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष पी. पी. बारदेशकर, एमआयआयडीसी सहाय्यक अभियंता विनीत कांदळगावकर यांनी घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरू केले.

# जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी संजय देशमुख

**चौक : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील नवघर येथील शिवसेना संपर्कप्रमुख संजय देशमुख यांची रायगड जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य पदी निवड झाली आहे.

संजय देशमुख हे मानकिवली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच असून शिवसेना उपतालुका प्रमुख म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे. त्यांच्या निवडीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification:

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/ MHD/Tech/ RE-Tender-25/ 2023-24 Dtd. 08.06.2023 **RFx No. 7000027636** | **Sub:** Invitation of SRM RE-Tender for the Providing & Fixing of Nonconductive Turbo Wind Driven Conical Bird Guards of various EHV Lines under KTL S/DN Mahad under EHV (O&M) Dn, Mahad for FY 2023-24 | Up to Rs. 24,99,120/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is the higher **Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess. **Bid Submission is From:** 08.06.2023 @ 00:00 Hrs to 14.06.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in** **Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089 **Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**

# शिवाजीनगरमध्ये भव्य जलकुंभाची निर्मिती

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत अमोघ ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर गावातील ग्रामस्थांना आणि विषेश करून महिलांना पाण्याची समस्या उद्भवू नये या करीता नवीन जलकुंभ उभारण्यात येणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शिवाजीनगर ग्रामस्थांच्या माध्यमातून हे जलकुंभ बांधण्यात येणार आहे. या जलकुंभाच्या कामाचे भूमिपूजन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत आणि अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि. ७) झाले.



शिवाजीनगर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मैदानात हे जलकुंभ उभारण्यात येणार आहे. यामध्ये खालची पाण्याची टाकी एक लाख ८० हजार लीटची तर वरची टाकी ८० हजार लिटरची असणार आहे.

या भूमिपूजनावेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, जयवंत देशमुख, मोतीलाल कोळी, स्वप्नील ठाकूर, साईचरण म्हात्रे, पी. के. ठाकूर, टी. के. ठाकूर, शनिदास ठाकूर, किशोर ठाकूर, नंदा ठाकूर, शोभा ठाकूर, रणजित ठाकूर, सुरेश ठाकूर, सुनील ठाकूर, प्रल्हाद ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर, अमित कडू, हरजीवन ठाकूर, शुभांगी ठाकूर, वंदना ठाकूर, आशा म्हात्रे, शैला ठाकूर, गीता ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

> **अतिशय महत्त्वाचा असा पाणीप्रश्न आता मार्गी लागणार आहे. पाणी हे गावात कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाला मिळाले पाहिजे. यासाठी गावकऱ्यांनीही शिस्त पाळली पाहिजे. यासोबतच जपून पाणी वापरावे. गावात जलकुंभाचे भूमिपूजन झाले. आता बांधकामाला सुरुवात होऊन दिवाळीपर्यंत म्हणजे येत्या सहा महिन्यामध्ये हे काम झाले पाहिजे.**
> **–लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार**

# वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाला शासनाचा नेहमीच पाठिंबा -राज्यपाल

**खारघर : रामप्रहर वृत्त**




वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन हे अत्यंत महत्त्वाचे असून या उपक्रमाला शासनाचा नेहमीच पाठिंबा असतो, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी बुधवारी (दि. ७) खारघर येथे केले. नवी मुंबई खारघर येथील श्री सत्य साई संजीवनी सेंटर फॉर चाइल्ड हार्ट केअर अ‍ॅण्ड ट्रेनिंग इन पेडियाट्रिक कार्डियाक स्किल्सचा पाचवा वर्धापन दिन सोहळा राज्यपाल बैस यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी ते बोलत होते.

श्री सत्य साई संजीवनी सेंटर फॉर चाइल्ड हार्ट केअरचे अध्यक्ष डॉ. सी. श्रीनिवास, पूज्य सद्गुरु मधुसूदन साई पदव्युत्तर संस्था रोहतकच्या कुलगुरू अनिता सक्सेना, प्र–कुलगुरू कृष्णा डॉ. विद्यापीठ, कराडचे डॉ. प्रवीण शिनगारे, कोंकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख आदी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यपाल रमेश बैस म्हणाले की, भारतात जन्मजात हृदयविकाराने जन्मलेल्या मुलांची अंदाजे संख्या दरवर्षी दोन लाखांपेक्षा जास्त आहे. म्हणूनच या आजाराबाबत जनजागृती करणे सर्वात महत्त्वाचे आहे. रोगाचे निदान आणि उपचार यावर लक्ष केंद्रित करून प्रतिबंध हे आमचे प्राथमिक ध्येय असले पाहिजे. जिल्हास्तरीय रुग्णालयांमध्ये रोगाचे निदान शोधून त्यावर उपचार करण्याच्या सुविधाही वाढवायला हव्यात. श्री सत्य साई संजीवनी रिसर्च फाउंडेशन जन्मजात हृदयविकारावर संशोधन करत असल्याचे पाहून आनंद व्यक्त करत संस्थेशी संबंधित शास्त्रज्ञ आणि डॉक्टरांचे त्यांच्या संशोधन कार्याबद्दल अभिनंदन करुन या वेळी राज्यपाल महोदयांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी रुग्णालयात हृदयाची शस्त्रक्रिया झालेल्या बाल रुग्णांना गिफ्ट ऑफ लॉईफ प्रमाणपत्र राज्यपालांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी श्री सत्य साई संजीवनी सेंटरचे अध्यक्ष डॉ. सी. श्रीनिवास, पूज्य सद्गुरु मधुसूदन यांची समोयोचित भाषणे झाली.





**पनवेल : राज्य शासनाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी भाजपचे अरुणशेठ भगत यांची नियुक्ती झाली आहे. त्यानिमित्त माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, भाजप सोशल मीडियाचे नितेश सोलंकी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी यांनी पुष्पगुच्छ देऊन अरुणशेठ भगत यांचे बुधवारी अभिनंदन केले. या वेळी मयुर कदम, चंद्रकांत नाईक, रहिम लदाप उपस्थित होते.**

# डिझेल चोरीप्रकरणी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या वाहनांतील डिझेलची चोरी करणाऱ्या त्रिकुटापैकी एकाला खारघर पोलिसांनी अटक केली आहे. सिराज इस्माईल पटेल असे या चोरट्याचे नाव असून पोलिसांनी त्याच्या दोन फरार साथीदारांचा शोध सुरू केला आहे. पोलिसांनी या चोरट्याची कार व त्याने चोरलेले ५०० लिटर डिझेल जप्त केले आहे.

खारघर पोलीस सायन–पनवेल मार्गावरील खारघर टोल नाका येथे गस्त घालत असताना तीन व्यक्ती रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या कंटनेरच्या टाकीतील डिझेल पाईपच्या सहाय्याने चोरत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांची चाहुल लागताच चोरट्यांनी पाईप व ड्रम त्याच जागी टाकून पलायन केले. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करत सिराज इस्माईल पटेल याला पकडले, मात्र त्याचे दोघे साथीदार सलमान कल्दानी व फिरोज कल्दानी हे दोघेही पळून गेले.

पोलिसांनी त्यांच्या वाहनाची तपासणी केली असता, त्यात ५०० लिटर डिझेलने भरलेले दोन ड्रम ठेवून आढळून आले. यावेळी डिझेलसह गाडी जप्त करून सिराज इस्माईल याला अटक करण्यात आली आहे.




**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कल्हे भाजपच्या वतीने गावात बुधवारी आयुष्यमान भारत योजनेंतर्गत लाभार्थी नोंदणी शिबिर घेण्यात आले. या वेळी कल्हे भाजपचे नेते शेखर कानडे, जीवन टाकळे, प्रवीण काळबागे आदी उपस्थित होते.**

## निवडक



### पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**उरण :** जागतिक पर्यावरण दिनाचेचे औचित्य साधून मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडच्या वतीने सोमवारी (दि. ५) ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड प्लांट हेड कमलजीत सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेडचे प्लांट हेड कमलजीत सिंग, अ‍ॅडमीनचे वरिष्ठ मॅनेजर आय. बी. सिंग, इएचएसचे वरिष्ठ मॅनेजर वसंत मुत्तेपवार, सेफ्टी मार्शल सदस्य आदी उपस्थित होते.



**उरण : पत्रकार घनश्याम कडू यांची कन्या प्रांजल कडू हिने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त त्यांचे रेखाचित्र काढून अनोख्या शुभेच्छा दिल्या.**

### सापडलेले पाकीट मालकाला सुपूर्द

**खारघर :** शहरात वाहतूक नियमन करत असताना हिरानंदानी उड्डाणपुलाखाली वाहतूक पोलीस सुनील साळुंखे आणि मयूर पाटील यांना सापडलेले पैशाने भरलेले पाकीट संबंधित प्रवाशाचा शोध घेऊन वाहतूक पोलिसांनी परत केले.



खारघर रेल्वे स्थानकाकडे जात असताना संजय हावळे यांचे हिरानंदानी उड्डाणपूल परिसरात पाकीट पडले. दरम्यान, खारघर वाहतूक शाखेत कार्यरत असणारे मयूर पाटील आणि सुनील साळुंखे यांना ते पाकीट सापडले. पाकिटातील व्हिजिटिंग कार्डच्या सहाय्याने दोघा वाहतूक पोलिसांनी संबंधित व्यक्तीचा शोध घेतला आणि पाकीट परत केले. या पाकिटात पैसे व काही ओळखपत्र होती. काही तासातच संबंधित व्यक्तीचा शोध घेत त्यांना त्याचे पाकीट परत केल्याने दोघा वाहतूक पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे विद्यार्थ्याला शैक्षणिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



(छाया : योगेश पाटील)

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवून नेहमीच मदतीचा हात देण्यात येत असतो. त्याअंतर्गत मंडळाच्या वतीने सार्थ संजय कुर्ले याला शिक्षणासाठी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली असून या मदतीचा धनादेश भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष तथा श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते देण्यात आला.

रोहा तालुक्यातील कोलाड आंबेवाडी येथील सार्थ संजय कुर्ले हा बॅचलर इन कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेण्यासाठी अमेरिका येथील सॅन फ्रांन्सिस्को स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये जाणार आहे. त्याच्या शिक्षणासाठी श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दोन लाख रुपयांची अर्थिक मदत करण्यात आली आहे. या मदतीचा धनादेश भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सार्थ यांचे वडील संजय कुर्ले यांना सुपूर्द करण्यात आला. या वेळी अनिल कोळी उपस्थित होते.

# दहावीत उर्दू गर्ल्स शाळेचे सुयश

**सलग पाच वर्षे १०० टक्के निकाल**

**पनवेल :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२३ मध्ये घेतलेल्या एसएससी अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेमध्ये पिपल अ‍ॅण्ड पॅराटंस असोसिएशन अंतर्गत येणाऱ्या पनवेलमधील मायनरटी उर्दू गर्ल्स हायस्कूलचा निकाल सलग पाच वर्षे १०० टक्के लागला आहे.

यामध्ये प्रथम सबा अदनान खान ७२ टक्के, द्वितीय नसीमा रईस खान ६८ टक्के, तृतीया राजीना मुजावर ६७ टक्के आली. या बद्दल शाळाच्या व्यवस्थापकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

# नवीन पनवेलच्या अत्रे कट्टातर्फे व्याख्यान




**पनवेल : वार्ताहर**

आत्मसन्मानासाठी ज्येष्ठांनी फिट आणि फाईन रहाण्याचे आवाहन डॉ. अर्चना जोशी यांनी नवीन पनवेल येथे केले. नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्टा आयोजित 'असंच जगू या छान' या अंतर्गत योग–आरोग्य–आहार व्याख्यानप्रसंगी त्या बोलत होत्या, त्यांच्यासोबत डॉ. हेमंत जोशी यांनीही आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

यापुढे बोलताना डॉ. अर्चना जोशी यांनी, नातवंडांना सांभाळणे व घरातील छोट्या कामांत युवा पिढीला ज्येष्ठांचा आधार हवा असतो. त्यांचा हा विश्वास टिकविण्यासाठी ज्येष्ठांनी तंदुरुस्त राहिले पाहिजे. युवा पिढीला आपले ओझे न वाटता आपला आधार वाटण्यासाठी ज्येष्ठांनी चौरस आहार, हलकाच पण पुरेसा व्यायाम, नियमित तपासण्या, लसीकरण, छंद जोपासणे आणि नातवंडांना आवडणाऱ्या गोष्टीत स्वतःची आवड निर्माण करणे या गोष्टी केल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

डॉ. हेमंत जोशी यांनी आरोग्यासाठी आज जगभरात केल्या जाणाऱ्या गोष्टी आपल्या पूर्वजांनी हजारो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या आहेत हे आपण विसरत चाललो आहोत हे खेदजनक असल्याचे डॉ. हेमंत जोशी यांनी नमूद केले. आजची पोट सुटण्याची समस्या सोडविण्यासाठी न बसता शक्यतो उभे राहून काम करणे, चहा पिणे बंद करणे, ताक पिणे, फक्त चवीपुरतेच मीठ अन्नावर घेणे आणि श्वासावर नियंत्रण ठेवणे हे उपाय नक्कीच उपयोगी पडतील, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत अत्रे कट्टाचे अरविंद करपे यांनी केले.













(सर्व छाया : संकेत भोईर, अक्षय शार्दूल)

**पनवेल :** तिरूमला तिरुपती देवस्थानाच्या श्री वेंकटेश्वरा स्वामी वारी मंदिराच्या भूमिपूजनासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उलवे नोडमध्ये बुधवारी आले होते. भूमिपूजनानंतर त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे, श्रीकांत शिंदे हेही उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या वेळी आमदार भरत गोगावले, महेश बालदी, महेंद्र थोरवे, मंदाताई म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, सुधीर ठाकूर, साईचरण म्हात्रे, अमोघ ठाकूर आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# दर्जा राखण्यावर लक्ष हवेच

यंदाच्या एनआयआरएफ यादीत पहिल्या शंभरांच्या क्रमवारीत दक्षिण भारतातील शिक्षणसंस्था सर्वाधिक प्रमाणात म्हणजे ३६ टक्के इतक्या आहेत. तर उत्तर भारतातील संस्थांचे प्रमाण २९ टक्के आहे. पश्चिम भारतातील शिक्षणसंस्थांचे प्रमाण २० टक्के तर पूर्व भारतातील राज्यांमधील संस्थांचे प्रमाण सर्वांत कमी १५ टक्के इतके आहे. एनआयआरएफची ही क्रमवारी यादी उच्चशिक्षण संस्थांनी केलेल्या स्वयंमूल्यमापनावर आधारित असते हेही लक्षात घेण्याची गरज आहे.

**गेल्या काही वर्षांपासून देशातील उच्च शिक्षण संस्थांबाबत केंद्र सरकारकडून नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क अर्थात राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा (एनआयआरएफ) जारी करण्यात येतो. २०२३ या वर्षाच्या या आराखड्यात मुंबई आयआयटीला देशातील सर्वोत्तम शिक्षण संस्थांच्या यादीत चौथे स्थान प्राप्त झाले आहे तर इंजिनिअरिंग शैक्षणिक संस्थांच्या यादीत आयआयटी मुंबई तिसऱ्या स्थानावर आहे. आराखड्यात आयआयटी मुंबईला मिळालेले हे स्थान ही आनंदाची बाब आहे, परंतु मागील वर्षी ही संस्था तिसऱ्या क्रमांकावर होती. याही संस्थेच्या रँकिंगमध्ये एका क्रमांकाने घसरण झाली आहे. देशातील दंत महाविद्यालयांच्या यादीमध्ये पुण्याच्या डी. वाय. पाटील विद्यापीठाला तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळाले आहे. ही दोन नावे वगळता महाराष्ट्रातील एकही विद्यापीठ वा महाविद्यालय सर्वोत्तम दहा विद्यापीठांच्या यादीत स्थान मिळवू शकलेले नाही याबद्दल स्वाभाविकपणे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीपासून अगदी आजतागायत मुंबई आणि पुणे ही दोन शहरे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणासाठी पसंतीची ठरत आली आहेत. महाराष्ट्रातील शिक्षणाचा उच्च दर्जा तसेच येथील सुसंस्कृत व सुरक्षित वातावरण हे त्यामागचे मोठे कारण नेहमीच मानले गेले आहे. मग आता महाराष्ट्रातील विद्यापीठांची या क्रमवारीत इतकी पिछेहाट का झाली आहे याचा निश्चितच गांभीर्याने विचार केला जाण्याची आवश्यकता आहे. शिक्षण संस्थांनी पाठवलेल्या आकडेवारीची ही यादी करताना पडताळणी केली जात नाही तसेच या क्रमवारीसाठी सहभाग घेणेही सर्व शिक्षणसंस्थांना सक्तीचे नाही. संस्थात्मक आकडेवारी गोळा करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांकडून स्वयंमूल्यमापन करून माहिती मिळवली जाते व त्याआधारेच या संस्थांची क्रमवारी जाहीर केली जाते. संस्थांनी स्वत:च स्वत:चे मूल्यमापन करण्याच्या या प्रक्रियेत किती शिक्षण संस्थांनी स्वत:चे मूल्यमापन प्रामाणिकपणे केले असेल याबाबतही अनेक स्तरांवर शंका व्यक्त केली जाते. त्यामुळे या संस्थात्मक क्रमवारीत देशातील तसेच राज्या-राज्यांतील शिक्षण संस्थांचे वास्तव प्रतिबिंब उमटतेच असे नाही. तरीही महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्था या यादीत मागे का पडल्या आहेत याचा गांभीर्याने विचार व्हायलाच हवा. केंद्र सरकारकडून देशातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नवे शैक्षणिक धोरण लागू केले जाणार आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याच्या हेतूनेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून हे नवे शैक्षणिक धोरण साकारले आहे. दर्जेदार शिक्षण ही काही मोजक्या लोकांची मक्तेदारी न राहता सर्वांना दर्जेदार आणि विकासाच्या संधी खुल्या करणारे शिक्षण मिळावे हा विचार त्याच्या केंद्रस्थानी आहेच. अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यामुळे देशातील उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा विचारही या धोरणात केला गेलेला आहे. दर्जा उंचावण्याच्या या प्रयत्नांचा लाभ अखेर विद्यार्थ्यांनाच मिळणार आहे.**

# परजिल्ह्यातील पतसंस्था पतहिनांना प्रतिष्ठादायक

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात गेल्या २०व्या शतकाच्या अखेरीस स्थानिक पतसंस्थांनी तालुक्यातील गोरगरीब जनतेला 'सहकाराचं कोंबडं आरवण्यापूर्वीच कापून खाल्लं' असा नैराश्यजनक अनुभव दिल्यानंतर नव्या २१व्या शतकाचे पहिले दशक संपल्यानंतर परजिल्ह्यातील न्यू सातारा पतसंस्था, मोरेमाऊली पतसंस्था-मुंबई आणि चिपळूण नागरी पतसंस्था या तीन पतसंस्थांनी आगमन केले आहे. सहकाराची विश्वासार्हता संपुष्टात आणणाऱ्या स्थानिक बुडीत पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे लांगूलचालन करण्याचे सत्र या पतसंस्थांनी अवलंबिले आहे. यामुळे आधीच्या पतसंस्था व राष्ट्रीयकृत बँकांना जेरीस आणणाऱ्या सराईत कर्जबुडव्यांना नवीन संधी चालून आल्याचे दिसून येत आहेत. अलिकडेच, गेल्या पंधरवडयात अवसायनात निघालेल्या पोलादपूर तालुका पतसंस्थेच्या संचालकांना सहकार खात्याकडून नोटीसा बजाविण्यात आल्या असून या सहकार खात्याकडून संचालकांना वारंवार दिलासा देण्याने ठेवीदारांच्या बुडीत रक्कमांचा परतावा होण्याची सुतराम शक्यता उरलेली नाही.

पोलादपूर तालुक्यात पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्था, पोलादपूर तालुका सरकारी कर्मचारी पतसंस्था, सिध्दीविनायक पतसंस्था, कामथी-ढवळी-सावित्री पतसंस्था, प्राथमिक शिक्षक पतपेढी, माजी सैनिक पतसंस्था, महाड येथील जिजामाता पतसंस्था व जनकल्याण पतसंस्था गेल्या शतकाच्या अखेरीस सुरू होऊन एकामागून एक अशा पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्था, महाड येथील जिजामाता पतसंस्था बंद पडल्या तर काहींचे कामकाज ठप्प झाले. यामुळे ठेवीदारांचे लाखो रूपयांचे नुकसान झाले तर कर्जबुडव्यांमध्ये संचालक मंडळाच्या संगनमताने बोगस प्रकरणांना मंजुरी घेऊन कर्जाऊ रक्कम उचलण्याची व ती बुडवण्याची प्रवृत्ती बोकाळली. यानंतरही या कर्जबुडव्यांनी नातेवाईकांच्या नांवे कर्ज घेऊन ती बुडविल्याने नातेवाईकांना तुरुंगात जाण्याची वेळ ओढवल्याच्या काही घटना आहेत. ठेवीदारांनी सुरू केलेल्या कायदेशीर लढाईत बुडीत पतसंस्थांच्या संचालकांना ठेवीदारांच्या भरपाईच्या रक्कमेची जबाबदारी सहकार आयुक्त आणि जिल्हा ग्राहक मंचातर्फे निश्चित करण्याचे निर्णयदेखील झाले आहेत, मात्र सहकार कायद्याने अद्याप संचालकांच्या मालमत्तेवर जप्ती व विक्रीचे आदेश न दिल्याने



संचालक मालमत्ता विक्री तसेच रक्कम भरण्याचे टाळण्यासाठी अपिलात जात असून स्वत:ची राष्ट्रीयकृत बँकांमध्ये पत नसल्याने नव्याने आलेल्या पतसंस्थांमध्ये नातेवाईकांच्या नावाने कर्जप्रकरणे करून तसेच सोनेतारण योजनेत बोगस सोन्याचे तसेच ग्राहकांचे दागिने गहाण ठेऊन कर्ज उचलत आहेत. एकीकडे, सहकार खात्याने पतसंस्थांना शाखाविस्तार करताना बुडीत पतसंस्था अधिग्रहित करण्याची अट घातली असताना त्यातही काहीशी शिथिलता आल्यानंतर परजिल्ह्यातील पतसंस्थांनी स्थानिक पतसंस्था अधिग्रहित करण्याऐवजी त्यांच्याच जिल्ह्यातील डबघाईस आलेली पतसंस्था विलीन करून शाखाविस्ताराचे धोरण अवलंबिले आहे. परिणामी, स्थानिक बुडीत पतसंस्थांना दिलासा मिळण्याऐवजी त्या कायमच्याच रसातळाला जातील, हे आता स्पष्ट झाले आहे. परिणामी, गेल्या १०-१५ वर्षांमध्ये पोलादपूर तालुक्यात सहकाराचा स्वाहाकार सर्वसामान्य जनतेचा विश्वास गमावण्यास कारणीभूत ठरला आहे.

पोलादपूर शहरात गेल्या दोन वर्षांपासून न्यू सातारा पतसंस्थेने अलिकडेच बिल्डींग कंस्ट्रक्शन व्यवसायातही गुंतवणूक केल्याने तालुक्यातील ठेवीदारांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. मोरेमाऊली पतसंस्थेने मुंबईमध्ये आणि पोलादपूर तालुक्यात आध्यात्मिक कार्यासोबत सहकाराची जोड देऊन यंत्रणा चालविल्याने तिची वाटचाल नेत्रदिपक राहिली आहे. अलिकडेच, पोलादपूर शहरात आलेल्या चिपळूण नागरी पतसंस्थेने शहरासह तालुक्यात सोनेतारण कर्जाचे बॅनर्स लावून ग्राहकांना आकर्षित करण्याचे धोरण अवलंबिले आहे. मात्र, हे धोरण पोलादपूर तालुक्यातील बुडीत पतसंस्थांच्या सराईत संचालकांच्या क्लुप्त्यांना वाव देणारे आहे.

पोलादपूर तालुक्यातील पतसंस्था बुडविण्याचा अनुभव असलेल्या सराईत एका माजी संचालकाने सोनेतारण कर्जवाटपावेळी जो दागिना घेऊन येईल तो त्याचाच दागिना असल्याचे आणि तो चोख सोन्याचा असल्याची दुहेरी खातरजमा न करताच कर्जमंजूरी तत्काळ केली जात असल्याचा फायदा उचलत परजिल्ह्यातील पतसंस्थांमध्येदेखील दागिने तारण ठेऊन कर्ज उचलण्याच्या क्लुप्ती वापरली. तालुक्यात ज्या सराफी व्यवसायिकांकडून दागिने परत मिळत नसल्याच्या तक्रारी ग्राहकांकडून पोलीस ठाण्यात दाखल होऊनही दूर्लक्ष झालेले दागिने तसेच चोख सोने नसलेले दागिने परजिल्ह्यातील पतसंस्थेमध्ये तारण ठेवले जात असल्याच्या घटना उघड होऊनही पतसंस्थेच्या व्यवस्थापन कौशल्यामुळे फारशी चर्चा झाली नाही.

तालुक्यात बेकायदेशीर इमारतीवर कर्ज घेऊन बुडविणाऱ्या कर्जबुडव्याच्या इमारतीवर जप्ती आणली तरी ती दुसऱ्याच्याच जमिनीवर बांधली असल्याने तिचा लिलाव होऊ शकत नसल्याचे उघड झाले असूनही परजिल्ह्यातील एका पतसंस्थेने पहिले बुडीत कर्ज फेडण्यासाठी या कर्जबुडव्याला नव्याने कर्ज मंजूर करून इमारत बेकायदेशीर असल्याचे जमीनमालकाने निदर्शनास आणूनही दूर्लक्ष केले आहे. याच बेकायदेशीर इमारतीवर सहकार विभागाने जप्ती आदेशही बजावला असून भूमीअभिलेख, पतसंस्था आणि सहकार विभागाने मूळ जमीनमालकाच्या नैसर्गिक न्याय तत्वाने मालकी हक्कावर गदा आणण्याचा प्रयत्न लवकरच फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यात दाखल होण्याची चिन्हे आहेत. यामध्ये दोन वकीलांनी चक्क भूमिअभिलेख कार्यालयाच्या चुकीच्या ३ ब प्रकारच्या मालमत्ता पत्राला अनुसुरून पतहिन संचालकाला मालमत्तेची मालकी सर्चरिपोर्ट द्वारे करून बारकौन्सिलकडून डीबार होण्याची कारवाई होण्याइतपत खोटेपणा केलेला दिसून येत आहे.

जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष पुरूषोत्तम गोखले यांनी ठेवीदारांना १० हजारांच्याखाली आणि ५० हजारापर्यंत अशा दोन टप्प्यांत ठेवी मिळण्याची मागणी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री चव्हाण यांनी पहिल्या टप्प्यातील ठेवीदरांना ठेवी परताव्यासाठी २०० कोटी रूपयांची तरतूद करण्यास मान्यता दिली असल्याचे सांगून ग्राहक मंचाकडे दोन वर्षांच्या कालावधीतील मॅच्युअर ठेवीदारांना परताव्यासाठी ग्राहक म्हणून दाद मागता येते. ठेवी पासबुकात वर्ग केल्यातरीही ती रक्कम देण्यास पतसंस्था बांधील आहे, असे स्पष्ट केले, मात्र त्यांनी जनजागृती ग्राहक मंचाची पोलादपूर शाखा सुरू करण्याची अट घातल्यानंतर केवळ पतसंस्थेत अडकलेले पैसे परत मिळविण्याच्या हेतूने त्यांच्याभोवती जमा झालेले ठेवीदार काहीसे पांगले.

पोलादपूर तालुक्यातील ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देण्यासाठी जनजागृती ग्राहक मंचाकडून तसेच माहितीचा अधिकार कार्यकर्ते रमेश खानविलकर यांच्याकडून झालेल्या पाठपुराव्यामुळे बुडीत पतसंस्थेच्या ठेवीदारांना दिलासा मिळू शकेल अशी परिस्थिती निर्माण झाली असताना सरकारदरबारी चुकीचा अहवाल सादर करून पतसंस्थेची कर्ज नातेवाईकांमध्येच वाटून घेत फसवणूक करणाऱ्या संचालकांना दिलासा देणाऱ्या सहकार विभागातील शुक्राचार्यांनी ठेवीदारांचा झालेला उठाव शमविण्यास मदत केली.


अलिकडेच, अवसायनात गेलेल्या पोलादपूर तालुका सहकारी पतसंस्थेच्या संचालकांना पुन्हा सहकार खात्याकडून नोटीसा बजाविण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली असून चौकशी आणि वसूली अधिकारी या संचालकांशी संगनमत करून जप्ती प्रक्रिया टाळत असल्याचे दिसून आले आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आता प्रमोशन कॉल आणि मेसेजपासून होणार सुटका!

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण म्हणजेच ट्रायने त्रासदायक कॉल आणि एसएमएसचा धोका थांबवण्यासाठी एक नवीन नियम बनवला आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने सेवा प्रदात्यांना कॉल आणि मेसेजसाठी ग्राहकांची संमती मिळवण्यासाठी, टिकवून ठेवण्यासाठी आणि रद्द करण्यासाठी दोन महिन्यांच्या आत एक एकीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे निर्देश दिले आहेत.



पहिल्या टप्प्यात केवळ ग्राहक प्रमोशनल कॉल्स आणि एसएमएस प्राप्त करण्यासाठी आपली संमती नोंदवू शकतील, असे भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने आता सर्व ॲक्सेस पुरवठादारांना डिजिटल सहमती अधिग्रहण विकसित आणि तैनात करण्यासाठी निर्देश जारी केले आहेत. दरम्यान, सध्या प्रमोशनल मेसेज प्राप्त करण्यासाठी ग्राहकांची संमती दर्शविणारी कोणतीही एकीकृत प्रणाली नाही आहे.

भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने सर्व ॲक्सेस पुरवठादारांना अशा सुविधा विकसित करण्यासाठी आणि नंतर टप्प्याटप्प्याने त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी दोन महिन्यांचा वेळ दिला आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने आपल्या टेलिकॉम कमर्शियल कम्युनिकेशन्स कस्टमर प्रेफरन्स रेग्युलेशन, २०१८ अंतर्गत हे निर्देश जारी केले आहेत.

**आता ग्राहकांची परवानगी घ्यावी लागणार!**

डीसीए प्रक्रियेमध्ये TCCCP विनियम २०१८ अंतर्गत ग्राहकांची संमती प्राप्त करणे, राखून ठेवणे आणि रद्द करण्याची सुविधा असणार आहे. संकलित केलेला संमती डेटा सर्व ॲक्सेस प्रदात्यांद्वारे स्क्रबिंगसाठी डिजिटल लेजर प्लॅटफॉर्मवर (DLT) शेअर केले जाईल.

**प्रमोशन कॉलची असेल वेगळी ओळख**

रिलायन्स जिओ, भारती एअरटेल, व्होडाफोन आयडिया यासारख्या दूरसंचार ऑपरेटरना संमती मागणारे मेसेज पाठवण्यासाठी १२७ने सुरू होणारा कॉमन शॉर्ट कोड वापरण्याची सूचना देण्यात आली आहे. जिओ, एअरटेल, बीएसएनएल सारख्या दूरसंचार कंपन्यांना बँकिंग, मार्केटिंगसाठी स्वतंत्र क्रमांक जारी केले जातील. यामुळे यूजर्स बँकिंग आणि प्रमोशनल कॉल्स आणि कॉल्स सहज ओळखू शकतील.

# जागतिक महासागर दिन

**निमित्त**

८ जून हा दिवस जागतिक महासागर दिन म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण जगभरात या दिवसाला विषय महत्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस ८ जूनपासून अधिकृतरीत्या साजरा करण्यास सुरूवात केली. समुद्र दूषित होण्याचे प्रमाण वाढल्याने त्यासंबंधी जनजागृती करणे आवश्यक बनले आहे. या संदर्भातला प्रस्ताव १९९२ मध्येच कॅनडाने ब्राझीलमध्ये झालेल्या वसुंधरा शिकार परिषदेत मांडला. त्याला संयुक्त राष्ट्रसंघाने २००८ मध्ये मान्यता दिली. तेव्हापासून 'द ओशन प्रोजेक्ट' या अमेरिकन संस्थेच्या सहकार्याने जागतिक महासागर दिन आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा होत आहे.



जगभरातील महासागरांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा दिवस वर्षातून एकदा साजरा केला जातो. महासागर हे संरक्षिले जावेत आणि नैसर्गिकदृष्ट्या असलेले त्यांचे महत्व जपले जावे असा हा दिवस साजरा करण्याचा मुख्य हेतू आहे. प्राणवायू, वातावरणाचे नियमन, अन्नाचा पुरवठा, औषधे आणि अन्य बाबींसाठी महासागरांचे स्थान महत्वाचे आहे. या निमित्ताने व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर महासागर रक्षणाची संधी घेतली जाते. दरवर्षी एखादा ध्येय ठेऊन हा दिवस साजरा केला जातो. २०१८ मध्ये प्लास्टिकपासून महासागराचे रक्षण हे ध्येय ठेवण्यात आले होते. पृथ्वीच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७१ टक्के भूभाग हा विविध प्रकारच्या जलस्रोतांनी व्यापला आहे आणि त्यापैकी तब्बल ९७ टक्के जलसाठा हा खाड्या, समुद्र आणि महासागरांच्या रूपात आहे.

'द ओशन प्रोजेक्ट' या १९९७ साली अमेरिकेत स्थापन झालेल्या (आणि आता जागतिक झालेल्या) प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, संग्रहालये यांच्या संघटनेने 'एकच महासागर' ही संकल्पना मांडली. परंतु भौगोलिकदृष्ट्या आणि राजकीयदृाही या 'एकच महासागरा'ची पाच खंडांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे समुद्र हा खाद्य आणि विपुल प्रमाणात ऑक्सिजन पुरविणारा स्रोत, जैवविविधतेचे महाकाय भांडार, अनेकविध रत्ने, खनिजे, तेल आपल्या उदरात बाळगणारा रत्नाकर. ही सर्व वर्णने अपुरी पडतील, अशा अगणित मार्गानी महासागर मानवासाठी व एकूणातच चराचर सृष्टीसाठी महत्त्वपूर्ण आहे.

जागतिक महासागर दिनानिमित्ताने संयुक्त राष्ट्रांचे सर्व सदस्य देश, त्यांतील सागरी परिसंस्थेशी संबंधित संस्था, अनेक स्वयंसेवी संस्था, संशोधक-अभ्यासक मिळून समुद्राविषयीचे विविध पैलू जगासमोर आणण्याचा प्रयत्न करतात. सर्वांनाच सागराबद्दल कुतूहल असते. अर्धी पृथ्वी जरी आपण तिच्या नैसर्गिक स्वरूपात राखू शकलो, तरी तब्बल दहा लाख प्रजातींना नष्ट होण्यापासून आपण वाचवू शकतो, असा शास्त्रज्ञांचा अभ्यासपूर्ण कयास आहे. सांडपाणी, औद्योगिक प्रदूषके, मुदत संपलेली वा घातक रसायने, प्लास्टिकच्या बाटल्या नि पिशव्या समुद्रात टाकल्या जातात. कचरा कोणताही असो-फेका समुद्रात! अहो केवढा मोठा आणि खोल समुद्र असतो समुद्र, एवढ्याशा कचर्याने काय होतंय? ही प्रथा जगभरातील (व्यक्तीपासून राष्ट्रांपर्यंत) बहुतेक सर्वांनीच पाळल्यामुळे आता मात्र परिस्थिती गंभीर बनली आहे. मासे मिळवण्यासाठी अधिकाधिक खोल समुद्रात जावे लागत आहे, पाण्याचा दर्जा घसरला आहे. हवामानावर परिणाम होत आहे. विशिष्ट सजीव नष्ट होऊ लागले आहेत हे सारे थांबविणे हेच या दिनाचे खरे उद्दिष्ट आहे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागल्यानंतर तालुक्यातील नवगाव येथील मच्छीमारांनी आपल्या नौका क्रेनच्या साहाय्याने बाहेर काढल्या.** (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

# पोटाची चरबी कमी करायचीय? 'ही' योगासने नियमित करा!



योग हा वजन नियंत्रित ठेवण्यासाठी उपयुक्त असून यामुळे शरीरातील कॅलरीज बर्न होण्यास मदत होते आणि स्नायूही मजबूत होतात. तेव्हा पोटाची चरबी कमी करण्यासाठी उपयुक्त असणारी सात योगासन आणि त्यांचे फायदे जाणून घ्या.

**ताडासन :** या आसनाच्या अंतिम स्थितीत शरीराला ताण देऊन, टाचा उंच करून पायांच्या बोटांवर उभे राहावे लागते. या आसनामुळे संपूर्ण शरीराला ताण मिळाल्यानं पोट आणि कमरेवरील चरबी कमी होण्यास मदत मिळते.

**हस्तपादासन :** हे आसन करताना कंबर आणि पोटावर जास्त ताण येतो. कंबर तसंच पोटाच्या स्नायूंचा चांगला व्यायाम होत असल्यानं पोटावरील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत मिळते.

**पवनमुक्तासन :** या आसनामध्ये पोटावर ताण येतो आणि पोटातील वायू बाहेर येण्यास मदत मिळते आणि पोटावरची वाढलेली चरबीदेखील कमी होते.

**भुजंगासन :** या आसनामुळे पाठीच्या कण्याचा लवचिकपणा वाढतो. पोटाच्या स्नायूंवर ताण आल्याने पचन संस्थेचं कार्य सुधारुन अपचनाच्या समस्या कमी होतात. महत्त्वाचे म्हणजे पोट आणि कमरेवरील चरबी कमी होते.

**धनुरासन :** पोट आणि कमरेवरील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी हे आसन म्हणजे उत्तम उपाय आहे. धनुरासनची अंतिम स्थिती धनुष्याच्या आकारासारखी दिसते. त्यामुळे या योगासनाला धनुरासन असे म्हणतात.

**पश्चिमतानासन :** या आसनात पायाच्या टाचेपासून डोक्यापर्यंत शरीराचा पाठीकडील भाग ताणला जातो. गुडघ्यामागील स्नायू आणि कमरेचे स्नायू अधिक लवचिक होतात आणि विशेषतः ओटी पोटावर दाब आल्यानं त्यावरील चरबी कमी होते.

**नौकासन :** या आसनामुळे तुम्हाला पोटावरील चरबी कमी करण्यासाठी चांगली मदत मिळले. कारण या आसनामध्ये पोटावरच जास्त ताण येतो. आसनाच्या अंतिम स्थितीत हात आणि पाय वर गेल्यानं शरीर नावेच्या आकाराप्रमाणे दिसतं.

# पावसाळ्यात नेरळ-अमन लॉज मिनी टॉय ट्रेन सेवा बंद

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

'माथेरानची राणी' म्हणून प्रसिद्ध असलेली मिनी टॉय ट्रेन पर्यटकांचे खास आकर्षण आहे, मात्र पावसाळ्यात नेरळ आणि अमन लॉजदरम्यानची प्रवासी सेवा खंडित करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. १० जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत ही सेवा बंद ठेवण्यात येईल. या दरम्यान माथेरान ते अमन लॉज शटल सेवा सुरू राहणार आहे.

मुंबईकरांना जवळचे थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरान ओळखले जाते. पावसाळ्यात येथील निसर्गदृश्य पाहण्यास पर्यटकांची मोठया संख्येने गर्दी जमते. नेरळ ते माथेरान धावणारी मिनी टॉय ट्रेन पर्यटकांचे विशेष आकर्षण केंद्र आहे, मात्र मध्यरेल्वेने नेरळ ते अमन लॉज दरम्यानची प्रवासी सेवा १० जून ते १५ ऑक्टोबरपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

माथेरान येथून रोज सकाळी ८.२०, सकाळी ९.१०, सकाळी ११.३५, दुपारी २, दुपारी ३.१५, सायंकाळी ५.२० वाजता सुटेल. ही गाडी अमन लॉज अनुक्रमे सकाळी ८.३८, सकाळी ९.२८, सकाळी ११.५३, दुपारी २.१८, दुपारी ३.३३, सायंकाळी ५.३८ वाजता पोहचेल.

अमन लॉज येथून रोज सकाळी ८.४५, सकाळी ९.४५, दुपारी १२, दुपारी २.२५, दुपारी ३.४०, सायंकाळी ५.४५ वाजता सुटेल आणि माथेरान येथे अनुक्रमे सकाळी ९.०३, सकाळी ९.५३, दुपारी १२.१८, दुपारी २.४३, दुपारी ३.५८, सायंकाळी ६.०३ वाजता पोहोचेल.

शनिवारी-रविवारी विशेष गाडी माथेरान सकाळी १०.०५, दुपारी १.१० वाजता सुटेल. ही गाडी अमन लॉज येथे सकाळी १०.२३ दुपारी १.२८ वाजता पोहोचेल तसेच अमन लॉज येथून विशेष गाडी सकाळी १०.३०, दुपारी १.३५ वाजता सुटेल आणि माथेरान येथे अनुक्रमे सकाळी १०.४८, दुपारी १.५३ वाजता पोहचेल.

सोमवारी ते शुक्रवारपर्यंत विशेष गाडी अमन लॉज येथून सकाळी १०.२२ वाजता सुटेल आणि माथेरान येथे सकाळी १०.४४ वाजता पोहचेल, तसेच माथेरान येथून दुपारी १२.२५ वाजता सुटेल आणि अमन लॉज येथे दुपारी १२.४३ वाजता पोहचेल.



---

## पनवेल महानगरपालिका
## वैदयकीय आरोग्य विभाग

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३ वैद्यकीय आरोग्य विभाग : ०२२-२७४५५७५१
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९ ई-मेल : mohpmc05@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/वै.आ.वि/ १२७१ /सन २०२३-२४ दिनांक:- ०७ /०६/२०२३

### पदभरती जाहिरात

**वाचा :-** १. मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२२-२३ नुसार मंजुर पदे
२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/सुधारित पदभरती समिती/१०२६६-१०६००/२०२३ दि.२६.०४.२०२३ रोजीचे पत्र
३. मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती/१०६७०-११०१६/ २०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्र.
४. सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्र. रानाआअ/शैक्षणिक पात्रता/एनयुएचएम/२४००४-२४१८७/२३ दि. २४.०५.२०२३ रोजीचे पत्र.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत, पनवेल महानगरपालिकेकरिता रिक्त असलेल्या पदांची पदभरती प्रक्रियेसाठी खालील दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. तरी इच्छुक व पात्र उमेदवारांच्या नेमणुका मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या स्तरावरून थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहेत. थेट मुलाखती आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड येथे खाली नमूद केलेल्या दिनांकास व वेळेत घेण्यात येतील.अर्जाचा विहित नमुना पनवेल महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.panvelcorporation.com वर उपलब्ध आहे.

| पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अ.जा | अ. ज | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्धवेळी वैद्यकीय अधिकारी | १५ | १ | १४ | बिंदु नामावाली लागू नाही | | | | | | | | | |
| Microbiologist | १ | ० | १ | • बिंदु नामावाली लागू नाही | | | | | | | | | |
| Epidemiologist | १ | ० | १ | • बिंदु नामावाली लागू नाही | | | | | | | | | |
| एकूण | १७ | १ | १६ | | | | | | | | | | |

• Microbiologist व Epidemiologist या संवर्गासाठी फक्त ०१ (एकच) पद मंजुर असल्याने शासन निर्णय क्र. बीसीसी-२०२१/प्र. क्र.८३५/१६-ब दि. २५/०२/२०२२, नुसार बिंदुनामावली लागु होत नाही.

**वयोमर्यादा-**

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. **१८.०६.२०२३** रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.
२. मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. २५ में २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा ७० वर्ष राहील.वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्टया व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधन कारक राहील.

**अर्ज भरण्या बाबतच्या सुचना-**

१. उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.
२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीखच अर्जात नमूद करावी.
३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष )अचूक नमुद करावे.
४. अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.
५. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे..
६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमेदवारांची यादी थेट मुलाखतीच्या वेळी सुचना फळकावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर ईमेल आडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू राहील चालू राहील व ई-मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
८. उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.
९. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.
१०. अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा, याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
११. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता/पात्रता-**

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | १४ | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ३०,०००/- |
| २ | मायक्रोबायोलॉजिस्ट Microbiologist | ०१ | MD Microbiology Preference will be given to experienced person | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | ७५,०००/- |
| ३ | इपिडिमिओलॉजिस्ट Epidemiologist | ०१ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health Preference will be given to experienced person | खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष व मागास वर्गीयांसाठी ४३ वर्ष | ३५,०००/- |

१. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
२. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
३. अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रात नमूद गुण व गुणांची टक्केवारी अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
४. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबंधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे .
५. उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.
६. उमेदवारांनी मुलाखतीवेळी आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.
७. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे..

**अनुभव -**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.
२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे.अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा...
३. अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.
४. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**संगणक अर्हता-**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा..

**लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र-**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासुन लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२०. पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.
२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रूजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे..

**अर्ज शुल्क -**

१. उमेदवारास अर्जासोबत अर्ज शुल्काचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१५०/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.१००/- रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अर्ज शुल्क असेल. Any बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. "INTEGRATED HEALTH AND FAMILY WELFARE SOCIETY PANVEL"
२. राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष व्यतिरिक्त इतर कोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्ष (Demand Draft) शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ते अर्ज अपात्र करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी-**

१. उमेदवाराने फॉर्म वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये.
२. राखीव जागेत स्वाक्षरी करावी.

**निवड प्रक्रिया-**

मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /१०६७०-११०१६/ २०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे :-

१. सदर पदभरती करिता पात्र होणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखत पनवेल महानगरपालिका स्तरावरील निवड समितीमार्फत घेण्यात येईल.
२. मुलाखतीद्वारे निवड करावयाची असल्यास मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**गुणांकन पद्धती -**

| अ.क्र | विवरण | अधिक्तम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knowledge | १० |
| २ | "Research & Academic Knowledge" | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Abilities | १० |
| ५ | **Experience** | १० |
| | a) For Govt. Experience | २ Marks for one year |
| | b) For Private Experience | १ Marks for one year |
| | एकुण गुण | ५० |

३. सदरील थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) करून त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
४. समान गुण प्राप्त झाल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**सर्वसाधारण सुचना-**

१. सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी https://www.panvelcorporation.com या संकेस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.
२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही, या पदाचा राज्यशासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.
३. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित ठोक मानधन आहे.
४. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक राहील. (उमेदवाराने कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरेल)
५. थेट मुलाखतीकरिता इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १३ जोडण्यात यावीत.

उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे.
संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड या पत्त्यावर पुढील वेळापत्रकानुसार थेट मुलाखतीकरिता उपस्थित राहावयाचे आहे.

**थेट मुलाखतीचे वेळापत्रक :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मुलाखती दिनांक | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | दि. १९.०६.२३ | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी ९ ते ११ | वासुदेव बळवंत फडके नाटयगृह पनवेल ता. पनवेल जि. रायगड |
| २ | मायक्रोबायोलॉजिस्ट Microbiologist | दि. २०.६.२३ | | |
| ३ | इपिडिमिओलॉजिस्ट Epidemiologist | दि. २०.०६.२३ | | |

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्र
४) गुणपत्रिका (सर्व वर्षाची गुणपत्रिका)
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/ Any other Medical Graduate with respective council registration(As Applicable).
६) शासकीय/निमशासकीय / खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
७) आधारकार्ड
८) सध्याचा फोटो
९) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
११) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र
१२) Domicile Certificate
१३) राष्ट्रीयकृत बँकेचा Demand Draft

**सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकते नुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समितीने राखून ठेवले आहेत.**

**सही/-**
(डॉ.आनंद गोसावी)
वैदयकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

**प्रतिज्ञापत्र**
**नमुना अ**

मी. श्री. /श्रीमती/कुमारी,........................................................................................
श्री...........................................................................
यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय....................वर्ष,
राहणार........................................
या द्वारे असे जाहिर करतो / करते की,
(१) मी............................................................................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
(२) आज रोजी मला......................(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.०१ऑक्टोबर २०२२ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)
(३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२० व तद नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
सही/-
दिनांक :-

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे**
**हमीपत्र**

मी.श्री./श्रीमती/कुमारी........................................................................................
वय................वर्ष....................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर........................................वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.
तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

**सही/-**

# झाडांच्या छाटलेल्या फांद्या रस्त्यावरच!

## सोसायटीतील रहिवाशांना नाहक त्रास | घनकचरा विभागाने लक्ष देण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ८ येथील सप्तश्री हाऊसिंग सोसायटीच्या प्रवेशद्वारासमोर मागील आठवड्यापासून झाडांच्या छाटलेल्या फांद्या पडून आहेत. याकडे घनकचरा विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.

सोसायटच्यांच्या प्रवेद्वारासमोर आणि नेरूळ येथील पदपथावर अनेक दिवसांपासून झाडांच्या फांद्या पडलेल्या आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर ही झाडे छाटण्याची कामे पालिकेच्या माध्यमातून सुरू आहेत, मात्र अनेक ठिकाणी छाटलेल्या फांद्या अनेक दिवसांपासून जाग्यावर पडून आहेत त्यामुळे राहिवाशांसह पादचारी याना चालणे अवघड होऊन बसले आहे. विविध सोसायटीच्या प्रवेशद्वारासमोर आणि पदपथावर पडलेल्या फांद्याची महापालिका प्रशासनाने त्वरित दखल घेत नागरिकांना अडथळा ठरणाऱ्या फांद्यां उचलण्यात यावी, अशी



मागणी केली आहे.

येथील सप्तर्षी सोसायटीच्या लगत झाडांच्या छाटलेल्या फांद्या एक आठवड्यापासून जागेवरच पडलेल्या आहेत त्यामुळे पदपथावरून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही अंतरावर रेल्वे स्थानक, शाळा मार्केट असल्यामुळे इथे नागरिकांची नेहीमच वर्दळ असते. झाडांच्या छाटलेल्या फांद्या पदपथावर, सोआयटीच्या प्रवेशद्वारासमोर पडल्याने पादचाऱ्यांची राहिवाशांची गैरसोय होत आहे. तसेच स्त्रिया लहान मुले यांना जीव मुठीत धरून भरधाव वाहनांचा सामना करत रस्त्यावरून मार्ग काढावा लागत आहे. तसेच नागरिकांना पदपथावर पडलेल्या झाडांच्या फांद्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कडक उन्हामुळे फांद्या सुकल्या असून त्यांचा पालापाचोळा इतर वाऱ्याने पसरत आहे. अनेक वेळा तर चालताना फांदी पायात अडकून अपघात देखील झाला आहे, शाळा कॉलेज, मार्केटमध्ये जाणाऱ्या एकाद्या मुलांचा पाय अडकून पडण्याची शक्यता आहे.

झाडाची छाटणी झाली मात्र फांद्या जागेवरच पडलेल्या आहेत त्यामुळे पालिकेच्या वतीने झाडांची छाटणी करून पदपथावर सोसायटीच्या प्रवेशद्वारावर अस्ताव्यस्त पडलेल्या फांद्या लवकर उचलण्यात यावे, अशी विनंती नागरिकांकडून होत आहे.

> **नेरूळमधील विविध सोसायटीच्या मागणीनुसार फांद्या तोडण्याचे काम सुरू असते. त्याचबरोबर फांद्या उचलण्याचे काम सतत सुरू आहे सप्तर्षी सोसायटीच्या जवळील फांद्या त्वरित उचलण्यात येथील.**
> **-बाबासाहेब राजळे, घनकचरा व्यवस्थापक, नवी मुंबई मनपा**

# वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांचे हाल

## भाजप नेते दशरथ भगत यांचे महावितरणला निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचे तसेच व्यावसायिकांच्या झालेल्या आर्थिक व मानसिक नुकसानीचे मूल्यांकन करून तशी रक्कम आगामी वीज देयकांतून वजा करा, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी वाशी येथील महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सिहाजीराव गायकवाड याच्याकडे केली आहे.



ऐन एप्रिल आणि मे महिन्यात तापमानाचा पारा वाढत असल्याने नागरिक उकाड्याने हैराण होत असताना, महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीच्या विद्युत पुरवठा सतत खंडित होत होता. त्यामुळे नागरिकांचे मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे तसेच छोटे-छोटे व्यवसाय बंद राहत असल्याने त्यांचा आर्थिक फटका मोठ्या प्रमाणावर व्यवसायिकांना आहे. बसला आहे. नागरिकांना झालेला मानसिक त्रास आणि व्यवसायिकांचे झालेले आर्थिक नुकसान यांचे मूल्यांकन करून, ते विज बिलातून कमी करा प्रभाग क्र. ६५ (वाशी सेक्टर ३०, ३०, ३१), प्रभाग क्र. ७७ (सानपाडा पाम बिच सेक्टर १,१३,१४,१५) व प्रभाग क्र ७८ (सानपाडा पाम बिच सेक्टर १६, १६अ, १७, १८, १९, २०, जुईनगर सेक्टर २२, २३) या तिन्ही प्रभागांतील परिसरातील वीजपुरवठा अखंडितपणे सुरू ठेवावा.

आजमितीपर्यंत खंडित झालेल्या वेळेत ग्राहकांच्या झालेल्या आर्थिक व मानसिक नुकसानीचे मूल्यांकन करून ती गोळाबेरीज रक्कम भरपाई म्हणून विद्युत बिलातून कमी करावी, अशी मागणी दशरत भगत यांनी केली. प्रशासनाविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही दिला.

# समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्याला अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दोन समाजात धार्मिक, जातीय द्वेष वाढून तेढ निर्माण होईल, अशा प्रकारच्या व्हिडियो पोस्ट टाकणाऱ्या प्रभाकर सिंग ला काल संध्याकाळी रसायनी मधील भीमसैनिकांच्या मदतीने पकडण्यात आले.




सध्या राज्यामध्ये सुरू असलेल्या जातीय धार्मिक पोस्ट संदर्भात अनेक दिवसांपासून पोलिस यंत्रणेने लोकांना सूचना दिल्या होत्या. रायगड जिल्ह्याचे एसपी सोमनाथ घार्गे यांनी सुद्धा विडिओच्या माध्यमातून सूचना दिल्या होत्या की, जातीय, सामाजिक तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे कोणीही पोस्ट विडिओ टाकू नका. एवढे असूनही रसायनीमध्ये राहणारा प्रभाकर सिंग नावाचा युवक हा सनातनी सिंग नावाने चालवत असणाऱ्या इन्स्टाग्राम अकाउंटमधून बौद्ध धर्माविषयी चुकीची पोस्ट केली होती. ही घटना रसायनी मधील भीमसैनिकांना समजल्यावर त्याने केलेली पोस्ट ही पोलीस प्रशासनाच्या निदर्शनात आणून दिल्यावर तत्काळ त्याला रसायनी पोलिसांनी अटक केली.

प्रभाकर सिंग याचे अकाउंट चेक करत असता त्याचे सर्व पोस्ट या धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या असून बौद्ध, मुस्लिम धर्मातील गोष्टीवर चुकीचे भाष्य केलेले दिसून आले. प्रभाकर सिंग ला अटक करून त्यावर १५३अ, २९५अ या कलम अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. यावेळी रसायनी परिसरातून आकाश कांबळे, आशिष जाधव, दीपक कांबळे, महेश चितळे, पंकज सोनावणे, सचिन चितळे, आर. आर. कांबळे, अशोक कवडे तसेच रसायनी परिसरातील बौद्ध आणि मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# पावसाळ्यात सर्व प्राधिकरणांनी सतर्क राहावे

## नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे बैठकीत निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

काही दिवसांतच पावसाळ्याला सुरुवात होणार असून पावसाळी कालावधीत नवी मुंबईतील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नागरिकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही याबाबत सतर्क रहावे, असे निर्देश देत नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी २१ एप्रिल रोजी शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दिलेल्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला.


(संग्रहित छायाचित्र)

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, शहर अभियंता संजय देसाई तसेच इतर विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता प्रत्यक्ष सभागृहात त्याचप्रमाणे सिडको, एमआयडीसीसह विविध प्राधिकरणांचे आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित अधिकारी वेब प्रणालीव्दारे उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रासाठी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली शहर आपत्ती व्यवस्थापन समिती कार्यरत असून त्यामध्ये नवी मुंबई महापालिकेसह सिडको, एमआयडीसी, एमएसईडीसीएल, पीडब्ल्यूडी, एमएमआरडीए, रेल्वे अशा विविध प्राधिकरणांचा समावेश आहे. या सर्व प्राधिकरणांचे मध्यवर्ती नियंत्रण नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयातील प्रादेशिक आपत्ती निवारण केंद्राद्वारे होत असते. वर्षातील ३६५ दिवस २४ द ७ कार्यरत असणाऱ्या या तत्काळ कृती केंद्राव्दारे विशेषत्वाने पावसाळी कालावधीत नवी मुंबईतील सर्व प्राधिकरणांचा समन्वय राखला जाऊन आपत्तीच्या घटनास्थळी तातडीने मदतकार्य पुरविण्यात येते.

या बैठकीच्या सुरुवातीलाच आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पावसाळापूर्व कालावधीत करावयाची कामे २५ मेपर्यंत पूर्ण करावीत अशा प्रकारे आधीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार प्रत्यक्ष किती कार्यवाही झाली याची संबंधित प्राधिकरणांकडून सविस्तर माहिती घेतली.

प्रत्येक प्राधिकणाने आपल्याशी संबंधित बाबीबाबत पावसाळापूर्व कामे झाली असल्याची खातरजमा करून घ्यावी व तसा अहवाल नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पाठवावा असे निर्देशित करतानाच पोलीस व वाहतूक पोलीस विभागानेही सतर्क रहावे व महानगरपालिकेच्या समन्वयाने संबधित कामे करून घ्यावीत, असे निर्देश दिले.

नागरिकांनी भरतीच्या काळात अतिवृष्टी झाल्यास घाबरून न जाता व अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यकता भासल्यास १८००२२२३०९ किंवा १८००२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर विनामूल्य संपर्क साधावा किंवा ०२२-२७५६७०६०/७०६१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, आपणास तत्काळ मदतकार्य उपलब्ध करून देण्यात येईल, असे आवाहन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

> **‘समन्वयही राखावा’**
> नवी मुंबई महापालिकेची आपत्ती निवारण केंद्रे ही आठ विभाग कार्यालये व ५ अग्निशमन केंद्रांमध्ये १ जून पासून सुरू झाली आहे. सर्वच प्राधिकरणांनीही आपापली केंद्रे सुरु करावीत व मध्यवर्ती केंद्र म्हणून नवी मुंबई मपालिकेच्या मुख्यालयातील तत्काळ कृती केंद्राशी नियमित समन्वय राखावा, असे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

# नवी मुंबईत पर्यावरणाचा जागर; नागरिकांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात ठिकठिकाणी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये विशेषत्वाने वाशी येथे कर्मवीर भाऊराव पाटील मॉडर्न महाविद्यालय येथे तृतीयपंथी संघटनेचे सदस्य, एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी तसेच लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेचे सदस्य यांनी एकत्र येत माझी वसुंधर अभियानाची सामुहिक शपथ अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या समवेत ग्रहण केली. या वेळी पर्यावरण विषयक जनजागृती रॅली काढण्यात आली व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



अशाचप्रकारे प्रदूषण विरहित वाहन म्हणून वापरल्या जाणाऱ्या युलू ई बाईकची विशेष जनजागृतीपर रॅली ज्वेल ऑफ नवी मुंबईपासून नेरूळ, बेलापूर परिसरात काढण्यात आली. यामध्ये आम्ही पर्यावरणपूरक वाहनांचा वापर करून प्रदूषणाला प्रतिबंध घालू असे अभिवचन देत ७५ ई बाईकर्सनी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्यासह जनजागृतीपर ई बाईक रॅलीमध्ये उत्साहने सहभाग घेतला. नेरूळ व बेलापूर परिसरात एका पाठोपाठ एक शिस्तीत निघालेली ही ई बाईक रॅली रस्त्यारस्त्यावर चालणारे, उभे असणारे नागरिक उत्सुकतेने पाहत होते व बाईकर्सना हात हलवून शुभेच्छाही देत होते. ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विविध विभागांच्या आढावा बैठकीवेळी दिलेल्या निर्देशानुसार बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात नागरिकांचा मोठ्या संख्येने लोकसहभाग असलेल्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये विद्यार्थी, युवक, महिला, ज्येष्ठ यांच्यासह नागरिकांनी उत्साहात सहभागी होत आपापल्या परिसरात जनजागृतीपर रॅली काढून स्वच्छता, वृक्षारोपण, प्रदूषण प्रतिबंध, प्लास्टिकचा वापर टाळणे अशा विविध विषयांवर घोषणा देत तसेच संदेश लिहिलेले बॅनर्स, हस्तफलक उंचावत लोकजागृती केली. प्रत्येक विभागामध्ये शेकडो नागरिक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. रॅली झाल्यानंतर परिसरात स्वच्छता मोहिमाही राबविण्यात आल्या.


वर्ष ३३वे || जय श्री गुरुदेव || स्थापना १९८६

|| राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ||
|| राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरीमहेश्वर महाराज की जय ||
|| राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ||
|| राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ||
|| राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय || (नंदेश्वर)

श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज पुण्यतिथी सप्ताह


श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)


श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)


श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

या बंधूनो या हो या | सद्गुरु चरणी धावत या ||
आपुले सुखाचे आवडी या | शाश्वत सुखाचे आवडी या ||
अभिमान टाकूनी या | मी पण सोडून या ||
या बंधूंनो या हो या || सद्गुरु चरणी धावत या ||

अनंत कोटी ब्रह्मांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर), श्री. स.स. भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) यांच्या पद्स्पर्शाने पुनित झालेल्या मारुती मंदिरात श्री समर्थ सद्गुरुनाथ दादामहाराज यांच्या ३७ व्या पुण्यतिथी सप्ताह श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ कृष्ण ३ शके १९४५ मंगळवार दिनांक ६-६-२०२३ रोजी सकाळी १० वाजता प्रारंभ होऊन ज्येष्ठ कृष्ण ५ गुरुवार दिनांक ८ जून २०२३ रोजी दुपारी १२ वाजता माऊलीवर पुष्पवृष्टीने समाप्त होईल. सप्ताहात श्री दासबोध, श्री. स. स. बाळकृष्ण महाराज चरित्रामृत, ज्ञानेश्वरी, भागवत या ग्रंथाचे पारायण होईल. तरी आपण आपल्या जीवनाच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा ह्या पर्वणीचा उपयोग सर्व भक्त भाविकांनी व गुरुबंधु-भगिनींनी भक्ती, संतसेवा करून आपले प्रापंचिक आणि पारमार्थिक जीवन सफल करावे ही कळकळीची विनंती.

दैनंदिन कार्यक्रम

गुरुवार दि. ८ जून २०२३

**सकाळी ९ ते १०.३० भजन :** सामुदायिक चक्री भजन बुवा- वसंतशेठ पाटील, (खारकोपर) बुवा रामनाथ पाटील (न्हावा), बुवा -गणपत ठाकूर (खारकोपर), बुवा-नितीन ठाकूर (खारकोपर), बुवा रशिक कानडा, बुवा -महेश पाटील (न्हावा), पखवाज - पांडुरंग रसाळ (गव्हाण), जयराम म्हात्रे (न्हावा) श्री. आत्माराम मोकल (सेक्टर-८, उलवे नोड), देवसागर साधक समाज मुंबई
**सकाळी १०.३० ते १२ प्रवचन :** श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, सोलापुर

**व्यवस्थापक अध्यक्ष -** श्री. कान्हाशेठ ठाकूर, उद्योगपती, न्हावेखाडी जय हनुमान ग्रामस्थ मंडळ, श्री गणेश मित्र मंडळ, न्हावेखाडी, उत्तरपाडा, , देवसागर साधक समाज सर्व महिला भगिनी, न्हावा, न्हावाखाडी, मु. न्हावा खाडी, ता. पनवेल, जि. रायगड

कार्यक्रमाचे स्थळ
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) जय हनुमान मंदिर
न्हावा खाडी, उत्तर पाडा, ता. पनवेल, जि. रायगड.


# आकुर्लीत उद्या मेगा फॅशन इव्हेंट

**पनवेल : वार्ताहर**

आयएनआयएफडी, पनवेल तर्फे ९ जून रोजी आकुर्ली येथील काकाजीनी वाडी येथे सोल सेन्सेशन ४.० या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ संदीप कोचर, अमन वर्मा, कॉमेडियन विकल्प मेहता, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, आयएनआयएफडीचे सीईओ आणि संस्थापक अनिल खोसला, मुख्य प्रायोजक - इंद्रावती हॉस्पिटल्स, ऐरोली मधुसूदन डेअरी, आदित्य बिर्ला ग्रुप - ग्रासिम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



सोल सेन्सेशन ४.० हा आयएनआयएफडी पनवेलच्या नवोदित विद्यार्थी डिझायनरचा मेगा फॅशन इव्हेंट आहे. गेल्या तीन वर्षांपासून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पदवीधर बॅचने मांडलेला हा शो आहे. या विद्यार्थ्यांनी यापूर्वी लॅक्मे फॅशन विक, न्यूयॉर्क फॅशन विक आणि लंडन फॅशन विक यासारख्या विविध आंतरराष्ट्रीय शोमध्ये भाग घेतलेला आहे आणि त्यांचे कलेक्शन प्रदर्शित केले आहे. फॅशन डिझायनर ने त्याच्या/तिच्या आगामी कपड्यांची ओळ दर्शवण्यासाठी केलेला हा कार्यक्रम आहे. ज्यामध्ये अनेक कलात्मक घटक जोडले गेले आहेत. जे फॅशन क्षेत्रातील नवीनतम फॅशन ट्रेंड लक्षात घेऊन त्याचे कौतुकाचे मूल्य मजबूत करतात. आय एन आय एफ डी पनवेलची सुरुवात आठ वर्षांपूर्वी झाली. येथे विद्यार्थ्यांना मोफत सेलिब्रिटी कार्यशाळा आणि औद्योगिक भेट दिली जाते.

आकुर्ली, पनवेल येथे होणाऱ्या कार्यक्रमात जवळपास २००० जण सहभागी होणार आहेत या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयएनआयएफडीचे डायरेक्टर सुरींदर सिंग यांनी केले आहे.

# वाशीत वृक्षारोपण



**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वाशी सेक्टर १७, नवरत्न हॉटेल गार्डनसमोरील दिक्षा बुक सेंटरतर्फे वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात शिवसेनेचे बंजारा समाज नवी मुंबई जिल्हा प्रमुख गुलाब भिडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ पत्रकार विनोद प्रधान, दीक्षा बुक सेंटरचे संचालक दिनेश चव्हाण, जनकल्याण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस सुरेंद्र सरोज, नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष संतोष बाबर, सचिव विनोद बाबर, सुदर्शन मोबाईल सेंटरचे संचालक शैलेश पटेल आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात ८९४० क्विंटल बियाणांची विक्री

## बोगस विक्रेत्यांपासून सावध राहण्याचे आवाहन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भातपेरणीच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या दुकानांमध्ये विक्रीला सुरुवात झाली आहे. आतापर्यंत आठ हजार ९४० क्वींटल बियाणांची विक्री झाली असून युरिया एक हजार ९२० मॅट्रीक टन व मिश्र खत १०६ मॅट्रीक टन इतका पुरवठा करण्यात आला आहे, मात्र बोगस बियाणे, खत विक्री करणाऱ्यांवर तालुका स्तरावर गुण नियंत्रण निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली असून त्यांची विक्रेत्यांवर नजर राहणार आहे.

यंदा पाऊस दहा तारखेनंतर पडणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी पेरणीसाठी सज्ज झाला आहे. शेतकऱ्यांचे डोळे पावसाकडे लागून राहिले आहे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी बियाणांसह खतांचा पुरवठा वेळेवर उपलब्ध व्हावेत यासाठी जिल्हा परिषद कृषी विभागाने बियाणे व खतांचे वितरण तालुका स्तरावरून वेगवेगळ्या दुकानांमध्ये केले आहे. जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत १७ हजार ४५० क्वींटल बियाणांची मागणी करण्यात आली होती. शासनाकडून सुमारे १६ हजार ५०० क्वींटल बियाणे प्राप्त झाला असून १९६ भात बियाणांच्या दुकानांमध्ये पुरवठा मागील दहा दिवसांपूर्वीच उपलब्ध झाला आहे. या दुकानांमधून आतापर्यंत आठ हजार ९४० क्वींटल बियाणांची विक्री झाली आहे. बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी दुकानांमध्ये वाढू लागली आहे.

***अंदाज घेऊनच पेरणी करावी : हवामान खात्याच्या निर्देशानुसार, राज्यात दहा तारखेनंतर पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. शेतकऱ्यांनी पेरणी करताना घाई करू नये, पावसाचा अंदाज घेऊनच पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषद कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.***

शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी तालुका स्तरावर गुण नियंत्रण निरीक्षकांची नेमणूक केली आहे. या निरीक्षकांमार्फत बियाणांचे नमुने तपासणे, प्रयोगशाळेत नमुने पाठविणे. त्यानंतर विक्रेत्यांवर कारवाई केली जाणार आहे. या गुणनियंत्रण निरीक्षकांची विक्रेत्यांवर नजर राहणार असल्याची माहिती जिल्हा परिषद कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

## इमेज कॅलेंडरतर्फे छायाचित्र स्पर्धा

**अलिबाग** : इमेज कॅलेंडरतर्फे छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील निसर्ग सौंदर्य, पारंपरिक सण हे विषय छायाचित्रांसाठी आहेत. स्पर्धेसाठी छायाचित्र १५ नोव्हेंबरपर्यंत jshigwan9gmail.com या ईमेलवर पाठवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### विविध पदांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अलिबाग** : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अखत्यारित असलेल्या जंजिरा सैनिकी विश्रामगृह, गोंधळपाडा-अलिबाग येथे कंत्राटी पद्धतीने अशासकीय सहाय्यक व्यवस्थापक हे निवासी पद स्थानिक माजी सैनिक संवर्गामधून तसेच एक महिला, पुरुष स्वयंपाकी हे पद भरावयाचे आहे. इच्छुकांनी आपला अर्ज २५ जूनपर्यंत सादर करावा. मासिक मानधन, कामाचे तास तसेच कामाचे स्वरुप हे मुलाखतीदरम्यान सांगण्यात येईल. इतर माहितीकरिता कार्यालयाचा दूरध्वनी (०२१४१-२२२२०८)वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.



**चौक : शिवस्वराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून वावंढळ ग्रामपंचायतीच्या वतीने दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी सरपंच सुहास कदम, उपरपंच अमोल कदम, सदस्य ललिता रामदास काईनकर, ग्रामसेवक मंगला रोखडे आदी उपस्थित होते.** (छाया : अर्जुन कदम)

## संकष्टी चतुर्थीनिमित्त महड येथे भक्तांची मंदियाळी



**खोपोली : प्रतिनिधी**

उन्हाळी सुटी संपत असताना व पावसाच्या प्रारंभी आलेल्या संकष्टी चतुर्थीनिमित्त बुधवारी (दि. ७) अष्टविनायक क्षेत्र महड येथे वरदविनायकाच्या दर्शनासाठी भक्तांनी गर्दी केली होती.

अनेक गणेशभक्त पहाटे पाच वाजता पायी चालत महड येथे दर्शनासाठी दाखल होतात. ही परंपरा याही संकष्टीला सुरू राहिली.

तालुक्यातील स्थानिकांसह मुंबई, ठाणे आणि पुणे भागातील भक्त संकष्टीनिमित्त मोठ्या संख्येने महड येथे वरदविनायकाच्या दर्शनासाठी येतात. पहाटे महाआरतीनंतर मंदिर दर्शनासाठी सर्वसामान्य भाविकांसाठी खुले करण्यात येते. तेव्हापासून दिवसभर भाविक दर्शनासाठी महड येथे दाखल झाले होते.

याहीवेळी भक्तांना दर्शनासाठी गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर व्यवस्थापन समितीकडून खास उपाययोजना करण्यात आल्या होत्या. यासाठी मंदिर व्यवस्थापन अधिकारी राजेंद्र बडगुजर व त्यांचे सहाय्यक कर्मचाऱ्यांकडून नियोजन करण्यात आले होते.

## कर्जत रेल्वेस्थानकातील समस्यांबाबत खासदार बारणे यांना निवेदन




**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकात मेल एक्स्प्रेस गाड्यांना पूर्वी प्रमाणे थांबा देण्याची मागणी करणारे निवेदन कर्जत पॅसेंजर असोसिएशनकडून खासदार श्रीरंग बारणे यांना देण्यात आले.

कोरोना काळात कर्जत रेल्वेस्थानकात थांबणाऱ्या अनेक मेल एक्स्प्रेस अद्याप सुरू केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना थेट कल्याण येथे जावे लागत आहे. मुंबई-पुणे दरम्यान धावणाऱ्या अनेक मेल एक्स्प्रेस गाड्यांना कर्जत रेल्वे स्थानकात थांबा देण्यात आलेल्या नाही. कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनतर्फे खासदार श्रीरंग बारणे यांना निवेदन देऊन मेल एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्याची मागणी करण्यात आली, तसेच पनवेल-कर्जत- पुणे- बारामती ही शटल पुन्हा सुरू करावी यांसह इतरही अनेक मागण्या निवेदनद्वारे करण्यात आल्या.

या वेळी कर्जत माजी नगरसेवक संतोष पाटील, रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे सचिव प्रभाकर गंगावणे, खजिनदार विनोद पांडे उपस्थित होते. खासदार बारणे यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन सर्व समस्या जाणून घेतल्या आणि लवकरात लवकर महाव्यवस्थापकांसोबत बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले.

### या गाड्यांना पुन्हा थांबे द्यावेत

- *कोयना एक्स्प्रेस, कोल्हापूर अहमदाबाद एक्स्प्रेस, कोणार्क एक्स्प्रेस, चेन्नई एक्सप्रेस, हुसेन सागर एक्स्प्रेस, सिद्धेश्वर एक्स्प्रेस, हुबळी एक्स्प्रेस, हैद्राबाद एक्स्प्रेस.*
- *पुणे-मुंबई डेक्कन एक्सप्रेस ही गाडी कर्जत रेल्वेस्थानकात थांबते, पण आरक्षित आणि जनरल तिकीट दिले जात नाही.*
- *पनवेल-कर्जत-पुणे-बारामती ही पॅसेंजर पुन्हा सुरू करावी*
- *पुणे-मुंबई सिंहगड एक्सप्रेसला ठाणे रेल्वेस्थानकात पूर्वीप्रमाणे थांबा द्यावा.*
- *हुबळी एक्स्प्रेस ही गाडी पूर्वीच्याच वेळेत पनवेल येथून सायंकाळी ७.४२ वाजता सोडावी.*
- *मुंबई-छत्रपती शाहु महाराज टर्मिनस (कोल्हापूर) सह्याद्री एक्स्प्रेस पुन्हा सुरू करावी.*

# प्रधानमंत्री मातृवंदना योजना नव्या स्वरूपात

**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातात्टिंळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकासप्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी..! हा एक महत्त्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे.**




केंद्रीय महिला बाल विकास विभागाच्या १४ जुलै २०२२च्या मिशन शक्ती मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे १९ मे २०२३च्या पत्रानुसार प्रधानमंत्री मातृवंदना योजना नव्या अटींसह लागू करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री मातृवंदना योजनेचे उद्दिष्ट गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या अवस्थेमुळे मिळणारी मजुरी कमी होण्यामुळे होणाऱ्या नुकसानीची आंशिकरित्या भरपाई मिळावी, जेणेकरून पहिल्या बाळाच्या जन्मापूर्वी आणि नंतर पुरेशी विश्रांती घेण्यास प्रोत्साहन मिळेल. हा लाभ दोन टप्प्यात पाच हजार रु. देण्यात येईल. जर दुसरे अपत्य मुलगी झाले तर मुलीविषयीच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल होण्याकरिता एकाच टप्प्यात सहा हजार रु. लाभ देण्यात येणार आहेत.




गर्भवती व स्तनदा मातांना कुटुंबातील पहिल्या जीवित अपत्यासाठी या योजनेंतर्गत गर्भवती व स्तनदा मातांनी काही निकष पूर्ण केल्यानंतर दोन टप्प्यात पाच हजार रु. तर दुसरी मुलगी झाल्यानंतर एका टप्प्यात सहा हजार रु. लाभ थेट लाभार्थीच्या आधार संलग्न (सीडेड) बँक खात्यात जमा केला जातो, मात्र वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना किंवा सार्वजनिक उपक्रमातील महिलांना तसेच सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याने सामान लाभ मिळत असल्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. एखाद्या लाभार्थीस दुसऱ्या गरोदरपणात जुळे, तीळे किंवा चार अपत्य झाल्यास आणि त्यापैकी एक मुलगी किंवा अधिक मुली असतील तरीदेखील दुसऱ्या मुलीसाठीचा लाभ अनुज्ञेय आहे.

नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार लाभार्थीकडे लाभ घेण्यासाठी ज्या महिलांचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या महिला, ज्या महिला ४० टक्के किंवा पूर्णतः दिव्यांग आहेत, बीपीएल शिधापत्रिका धारक महिला, आयुष्मान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत महिला लाभार्थी, ई-श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी, मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती यापैकी किमान एक कागदपत्र असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ मिळण्यासाठी वरील नमूद किमान एक कागदपत्रांव्यतिरिक्त लाभार्थी आधार कार्ड, परिपूर्ण भरलेले माता आणि बाल संरक्षण कार्ड, लाभार्थीच्या स्वतःच्या बँक पासबुकची झेरॉक्स, नवजात बालकाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र, आरसीएच नोंदणी क्रमांक देणे आवश्यक आहे, मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील आशा कार्यकर्ती, आरोग्यसेविका, सेवक, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, नागरी आरोग्य केंद्र येथे संपर्क साधावा. फॉर्म नोंदणी आणि कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर लाभार्थीची माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर भरल्यानंतर विनाअडथळा फॉर्म मान्य झाल्यास लाभार्थीच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा होईल.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

**परिशिष्ट क्र. १६**
**(उपविधी क्र. ३५ अन्वये)**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या**
**किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**(मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**
**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता : नवीन पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ........... धारण करणाऱ्या श्री. विजय दत्तात्रय जाधव यांचे तारीख १०/०६/२०१९ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतील, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या / हरकती आल्या तर,त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल, नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी / दुपारी १२ वा ते सकाळी / दुपारी ४ वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : पनवेल
दिनांक ०७/०६/२०२३

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
यांच्या करिता आणि वतीने

**सही/-**
**सचिव**
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्यादि सेक्टर २, नवीन पनवेल.

**गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग**
मु. त्रिमुर्ती प्लाझा, बी विंग गाळा नं. १०९ पहिला मजला अलिबाग अर्बन बँकेसमोर,
ता. अलिबाग जि. रायगड
फोन नं.७७२२०२१७२१
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये**
**जाहीर लिलाव नोटीस**

गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतुन श्रीमती भावना शंकर पाटील मु. कुरूळ ता. अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे यांचे जामीनदार श्री. शंकर रामचंद्र पाटील यांची मालमत्ता कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार बुधवार दिनांक २८/०६/२०२३ रोजी दुपारी ठिक ११.३० वाजता वसुली अधिकारी हे गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या संस्थेच्या मुख्य कार्यालयात हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे. त्या परिस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करतील.

**जाहीर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

तुकडी व जि. रायगड, पोट तुकडी व ता. अलिबाग रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती ता.अलिबाग हद्दीतील ग्रामपंचायत कुरूळ येथील श्रीमती भावना शंकर पाटील यांचे जामिनदार श्री. शंकर रामचंद्र पाटील रा. कुरूळ ता. अलिबाग यांची खालील वर्णनाची मिळकत

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाची तारीख | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नाव व गावाचे नाव | मिळकत नं. | क्षेत्रफळ | मिळकतीचे वर्णन | शेरा इतर बोजे (नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८७/१९ ०८/०२/२०१९ | श्रीमती भावना शंकर पाटील मु. कुरुळ ता. अलिबाग जि. रायगड जामिनदार श्री. रामचंद्र शंकर पाटील मु. कुरूळ | कुरुळ गाव ता. अलिबाग घर क्र. ५२१ अ | २७५ चौ.फुट | पक्के वीट बांधकाम छप्पर सिमेंट पत्रा | गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचा रु. १०,००००० /- अक्षरी दहा लाख रुपयेचा बोजा |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१ जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार ) मात्र एवढी रकम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार पतसंस्थेकडे राहतील
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पूर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६ अपसेट प्राइज (वाजवी किंमती) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत. अपसेट प्राइज रु. रू.९,६४,५००/- अक्षरी नऊ लाख चौसष्ट हजार पाचशे रुपये आहे.

ठिकाण अलिबाग
दि. २९/०५/२०२३

शिक्का

**सही/-**
**वसुली अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग**
मु. त्रिमुर्ती प्लाझा, बी विंग गाळा नं. १०९ पहिला मजला अलिबाग अर्बन बँकेसमोर,
ता. अलिबाग जि. रायगड
फोन नं.७७२२०२१७२१
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये**
**जाहीर लिलाव नोटीस**

गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या पतसंस्थेतुन श्री. शंकर रामचंद्र पाटील मु. कुरूळ ता. अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे यांची मालमत्ता कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार बुधवार दिनांक २८/०६/२०२३ रोजी दुपारी ठिक १२.३० वाजता वसुली अधिकारी हे गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग या संस्थेच्या मुख्य कार्यालयात हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे. त्या परिस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करतील.

**जाहीर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

तुकडी व जि. रायगड, पोट तुकडी व ता . अलिबाग रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती ता.अलिबाग हद्दीतील ग्रामपंचायत कुरूळ येथील श्री. शंकर रामचंद्र पाटील रा. कुरूळ ता. अलिबाग यांची खालील वर्णनाची मिळकत

**मालमत्तेचे वर्णन**

| निवाड्याची किंवा आदेशाची तारीख | निवाडा किंवा आदेश ज्या इसमाविरुध्द दिला आहे त्यांची नाव व गावाचे नाव | मिळकत नं. | क्षेत्रफळ | मिळकतीचे वर्णन | शेरा इतर बोजे (नमूद करा) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८६/१६ ०८/०२/२०१९ | श्री. शंकर रामचंद्र पाटील मु. कुरुळ ताकु अलिबाग जि. रायगड | कुरुळ गाव ता. अलिबाग घर क्र. ३४८ ब घर क्र. ५२१ ब | घर क्र.३४८ ब ५७६चौ.फुट घर क्र.५२१ ब २७५चौ.फुट | पक्के वीट बांधकाम छप्पर सिमेंट पत्रा | गृहलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचा रु. ९,००००० /- अक्षरी नऊ लाख रुपयेचा बोजा |

**लिलावाच्या शर्ती व अटी -**

१ जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार ) मात्र एवढी रकम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार पतसंस्थेकडे राहतील
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पूर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६ अपसेट प्राइज (वाजवी किंमती) पेक्षा कमी किमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत घर क्र. ३४८ ब ची अपसेट प्राइज रु. २०,२०,१००/- अक्षरी रुपये वीस लाख वीस हजार शंभर रूपये इतकी आहे. घर क्र.५२१ ब ची अपसेट प्राइज रू.९,६४,५००/- अक्षरी नऊ लाख चौसष्ट हजार पाचशे रुपये आहे.

ठिकाण अलिबाग
दि. २९/०५/२०२३

शिक्का

**सही/-**
**वसुली अधिकारी**
**रायगड-अलिबाग**



# ‘आरटीआयएससी’चे कराटेपटू चॅम्पियन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या (आरटीआयएससी) कराटेपटूंनी पालघर येथे आयोजित राष्ट्रीय चॅम्पियनशीपमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल ‘आरटीआयएससी’चे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

निहान्सिकी कराटे आणि स्पोर्ट्स फेडरेशन यांनी ४३वी राष्ट्रीय उन्हाळी कराटे सेमिनार चॅम्पियनशीप पालघर केळवा रोड येथे आयोजित केली होती. यामध्ये महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक, केरळ राज्यातील मिळून २००हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. यात आरटीआयएससीच्या ३५ कराटेपटूंचा समावेश होता.

स्पर्धेत आरटीआयएससीच्या कराटेपटूंनी १५ सुवर्ण, १८ रौप्य आणि २८ कांस्यपदके जिंकून पहिल्या क्रमांकाचा चषक पटकाविला. जीविका पाटील, सोहम डोलासिया, निमिष चौधरी, उत्कर्ष नारायण हे ब्लॅक बेल्ट ही परीक्षा उत्तीर्ण झाले. या सर्वांना प्रशिक्षक राकेश तिवरेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी कराटेपटूंचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी अमोघ ठाकूर, प्रणित गोंधळी श्यामनाथ पुंडे, पालक उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थिनींचे कुस्ती स्पर्धेत सुयश





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खालापूर येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सुयश संपादन केले आहे.

रायगड जिल्हा कुस्तीगिर संघाच्या मान्यतेने सौ. माधवीताई नरेश जोशी युवा प्रतिष्ठान, ईगल ग्रुप आयोजित भावी खासदार केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या ४३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक राजनंदिनी धुंधले, तर ७३ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक स्मिता शर्मा हिने पटकावला. या दोघींनाही चषक व पाच हजार रुपये असे पारितोषिक मिळवले. यशस्वी विद्यार्थिनींचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांना विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांचे तसेच क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले तसेच उज्ज्वल भविष्यासाठी शुभच्छा दिल्या.

### फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा

# जोकोव्हिचची उपांत्य फेरीत धडक

**पॅरिस : वृत्तसंस्था**

सर्बियाच्या तिसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोव्हिचने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे, तर महिला एकेरी गटात अरिना सबालेन्का आणि चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हा यांनी आपापल्या उपांत्यपूर्व सामन्यात विजय नोंदवत उपांत्य फेरीत धडक मारली.



जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या जोकोव्हिचने कारेन खाचानोव्हवर ४-६, ७-६ (७-०), ६-२, ६-४ असा विजय नोंदवला. पहिल्या सेटमध्ये खाचानोव्हने जोकोव्हिचला चांगली टक्कर दिली. त्याने सेट ६-४ असा जिंकत आघाडी घेतली. यानंतर मात्र जोकोव्हिचने आपला खेळ उंचावताना खाचानोव्हला पुनरागमनाची संधीच दिली नाही आणि सलग तीन सेट जिंकत उपांत्य फेरीतील आपली जागा निश्चित केली. पुरुष एकेरीत डेन्मार्कच्या होल्गर रूनने अर्जेटिनाच्या फ्रॅन्सिस्को सेरुनडोलोला ७-६ (७-३), ३-६, ६-४, १-६, ७-६ (१०-७) असे चुरशीच्या लढतीत नमवले.

महिला एकेरीत दुसऱ्या मानांकित सबालेन्काने युक्रेनच्या एलिना स्वितोलिनावर ६-४, ६-४ असा विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच सबालेन्काने स्वितोलिनावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. अन्य सामन्यात बिगरमानांकित मुचोव्हाने २०२१च्या उपविजेत्या अनास्तासिया पावलुचेनकोव्हाला ७-५, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवत स्पर्धेची प्रथमच उपांत्य फेरी गाठली. तिने दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. पावलुचेनकोव्हाचा गेला सामना तीन तासांहून अधिक चालला. त्यामुळे सामन्यातील खेळावर त्याचा परिणाम जाणवला. पहिल्या सेटमध्ये आव्हान उपस्थित करणाऱ्या पावलुचेनकोव्हाला दुसऱ्या सेटमध्ये फार काही करता आले नाही. अन्य सामन्यात अग्रमानांकित पोलंडच्या इगा श्वीऑनटेकला युक्रेनच्या लेसिया त्सुरेन्कोविरुद्ध पुढे चाल मिळाली. श्वीऑनटेक पहिल्या सेटमध्ये ५-१ अशी आघाडीवर असताना त्सुरेन्कोने माघार घेतली.

# ...म्हणून अश्विन संघाबाहेर -रोहित

**लंडन : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या फायनलमध्ये टीम इंडियाने रविचंद्रन अश्विनला प्लेइंग इलेव्हनमधून वगळले. याचे खुद्द कर्णधार रोहित शर्माने उत्तर दिले.

नाणेफेकीनंतर रोहित म्हणाला, हा निर्णय कठीण होता, पण परिस्थिती लक्षात घेता त्याला चार वेगवान गोलंदाजांची निवड करावी लागली. अश्विन हा मॅचविनर आहे यात वादच नाही आणि वर्षानुवर्षे तो आम्हाला सामने जिंकून देत आहे, पण संघाच्या गरजा लक्षात ठेवाव्या लागतात. त्यानुसार अश्विनला संघात घेता आले नाही.






# मैदानी खेळ लोप पावत चालले..!

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

उन्हाच्या सुटच्यांमध्ये बच्चेकंपनीची मैदानी खेळांत लगबग असायची, मात्र सध्या उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये सन्नाटा दिसून येत आहे. लपंडाव, गोट्या, भोवारा, विटी दांडू, कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या असे विविध खेळ जणू सध्याच्या मुलांना माहितीच नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

बदलत्या काळानुसार पारंपरिक खेळ लोप पावत चालले आहेत. एकविसाव्या शतकामध्ये मुलांना परंपरागत खेळ जणू काही माहितीच नाही. प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्ट फोन असल्यामुळे सध्याच्या मुलांचा कल हा ऑनलाइन गेम खेळण्याकडे जास्त दिसत आहे.

पूर्वी सुटी लागताच लहान मुले एकत्र जमून विविध खेळ खेळत. त्या खेळांचा गोंगाट कानावर पडायचा, मात्र हल्ली तसे नसून सर्वत्र शांतता पसरलेली आहे. विज्ञान जसजशी क्रांती घडवत गेले तसा माणसांमध्ये बदल होत गेला आणि सध्या शहरी भागात उन्हाळी शिबिर चालवण्याची पद्धत उदयास आली आहे. पूर्वी मैदानी खेळ खेळून शरीर सुदृढ, धष्टपुष्ट बनायचे, मात्र सध्या ऑनलाइन गेममुळे मुले कमकुवत बनत चाललेली आहेत.



मुलांना मोबाईल, कॉम्प्युटरवरील गेमची इतकी आवड निर्माण झाली आहे की त्यांना एक प्रकारचे व्यसन लागले आहे. जर ऑनलाईन गेम उपलब्ध करून दिला नाही तर मुलांमध्ये चिडचिडेपणा दिसून येतो. अनेक मुले तर मोबाईलशिवाय जेवत नाहीत अशी भयानक परिस्थिती सध्याच्या काळात निर्माण झाली आहे.

उन्हाळ्याची सुटी मामाच्या गावाला जायचे, विविध खेळ खेळायचे यासाठी असून सध्याची मुले मात्र या सुटीमध्ये घरातच बसून राहिल्याने मुलांचा जो व्यायाम या वयात व्हायला हवा तसा होत नाही. त्यामुळे मुलांना लहान वयातच आरोग्याच्या विविध समस्या जाणवतात. तासन् तास मोबाईल, कॉम्प्युटरसमोर बसल्याने लहानपणीच मुलांना चष्मे लागत आहे. शरीराची पुरेसी वाढ न होणे, भूक न लागणे, चिडचिडेपणा अशा आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

खरेतर लपंडाव, खो-खो, कबड्डी, आट्यापाट्या अशा विविध खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम होत होता. यामुळे मुलांचे आरोग्यदेखील सुदृढ राहत होते, पण मैदानी खेळ न खेळता घरातच बसून राहिल्याने आज मुलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुख्य म्हणजे पालक आपल्या मुलांना घरातच बसून ठेवतात. यामुळे त्यांच्या शरीराचा सर्वांगीण विकास होत नाहीए.

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये आई-वडील उन्हामुळे बाहेर निघू देत नाहीत. घरातच बसून कॅरम, बुद्धिबळ असे खेळ खेळायला लावतात. शाळा सुरू झाल्यावर अभ्यासामुळे काही खेळताच येत नाही. शाळा, ट्युशन, घरी आल्यावर अभ्यास यामध्ये स्वतःलाच वेळ मिळत नाही. तर खेळायचे कधी?
**-ऋतुजा काने,** विद्यार्थिनी

उन्हाळी शिबिरे चालविली जातात, त्यांचा उद्देश मुलांना खेळ खेळवणे कमी आणि पैसे कमवण्याचा अधिक असतो. पालकांनी आपल्या पाल्यांना पारंपरिक खेळ खेळायला प्रवृत्त करायला हवे.
**-सगरनाथ भंडारी,** शिक्षक

नोकरी करीत असल्यामुळे मुलांवर जास्त लक्ष देता येत नाही. मोबाईलमुळे मुलं ऐकतात, एका जागेवर बसतात, नाईलाजाने मोबाईल द्यावा लागतो.
**-संगीता बोरचटे,** पालक






# डब्ल्यूटीसी फायनलमध्ये ओडिशा रेल्वे अपघातातील मृतांना श्रद्धांजली



**लंडन : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील अंतिम सामन्यात ओडिशा येथे झालेल्या रेल्वे अपघातातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

ओडिशातील बहेनगा बाजार रेल्वेस्थानकाजवळ २ जून रोजी तीन ट्रेनच्या अपघातात किमान २८८ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे ९०० जण जखमी झाले आहेत.

डब्ल्यूटीसी फायनलमध्ये भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सामन्याला सुरुवात होण्यापूर्वी दोन्ही संघांनी ओडिशा येथे झालेल्या रेल्वे दुर्घटनेतील मृतांना दोन मिनिटे मौन बाळगून श्रद्धांजली वाहिली तसेच मृतांच्या स्मरणार्थ दोन्ही संघांनी डाव्या हाताला काळी पट्टी बांधली आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com